

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. ११३
९८३५
REFBK-0005351

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रं. क्रमांक ११९२
दि. ३१५/३८
१७९

# क्षि ति जा व र

## [ कवन–संग्रह ]

कवि दत्तप्रसन्न कारखानीस

REFBK-0005351

4351

प्रकाशिका

सौ. उषा जोशी (रुईकर) दादर, मुंबई

मुद्रकः—श्री कृष्णाजी नारायण सापळे
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस
१५–१७ त्रिभुवनरोड, मुंबई नं. ४

प्रथमावृत्तीचे सर्व हक्क सौ. उषा जोशी ( रुईकर ) यांचेकडे आहेत.

किंमत १ रुपया प्रथमावृत्ति मे, १९३५



प्रि० प्रल्हाद केशव अत्रे

# संधि-प्रकाश

नं. ... ता. ...

नंदादीप लावितां आला नाहीं तरी त्याची वात सारल्यानेसुद्धा पुण्य लाभतें असें म्हणतात तीच स्थिति या प्रकाशनाचे बाबतींत झाली आहे.

मराठी वाङ्मयाची हौसेनें सेवा करणारे लेखक व लेखिका प्रत्यहीं नव्यानव्यानें पुढें येत आहेत आणि त्याचप्रमाणें प्रकाशकांची संख्याही दिवसेंन् दिवस वाढत आहे. मराठी भाषेचें हें एक सुचिन्हच होय. प्रत्यक्ष साहित्यसेवा जरी हातून झाली नाहीं तरी वाङ्मयप्रकाशनाला हातभार लाविल्याची सेवा, शारदादेवीच्या दरबारीं रुजूं होते अशी माझी अल्प समजूत आहे.

आजकालच्या कठीण जीवनकलहाच्या व जागतिक मंदीच्या काळात, अशा प्रकारचें कार्य अंगिकारणें म्हणजे धाडसच आहे. तरी पण आपुलकीच्या भावनेनें आम्हांला सहाय्य करणारे कांहीं साहित्यसेवक आणि उदार हृदयी रसिकवर्ग यांच्या सहानुभूतीच्या पाठबळावरच आम्ही हें कार्य आरंभिलें आहे. इकडचा व श्रीयुत दत्तप्रसन्न कारखानीस याचा बाळपणापासूनचा बंधुतुल्य निकट स्नेह लक्षांत घेतां त्याच्या कवनसंग्रहाचें पहिलें प्रकाशन आम्ही घेतलें हें उचितच होय.

' जर स्मृति नसती तर साऱ्या दुःखाचा शेवट झाला असता ' असें कै. कवि-वर्य गोविंदाग्रजांनीं एका ठिकाणीं म्हटल्याचें स्मरतें. त्याचप्रमाणें पुढें जाऊन असेंही म्हणतां येईल कीं, जगांत जर ' आपुलकी ' नसती तर आज सुखाचे चाललेले संसार दिसले नसते. आणि म्हणुनच

' नान्दे आपुलकी जगांत म्हणुनी वाटे जगावे मला '

या कविवचनाचें सत्यत्व पुरेपूर पटतें. या आपुलकीच्या भूमिकेवरच उभें राहून, आमच्या विनंतीस मान देऊन महाराष्ट्राचे लाडके विनोदी लेखक, कवि व नाटककार श्री. प्रल्हाद केशव अत्रे यानी संग्रहाला साजेल अशी सुंदर व मार्मिक प्रस्तावना लिहून दिली याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोंत. ' लग्न करून पहावें व घर बांधून बघावें ' या म्हणीलाच ' पुस्तक प्रकाशन निर्विघ्नपणें पार पाडून दाखवावें ' अशीही पुस्ती अलीकडे जोडिली जाते; व ती थोडीफार खरीही आहे. परंतु

**' आपुलकी भावनेनें**
**मृत्तिकेचें होई सोनें ! '**

या कव्युक्तीला अनुसरून आम्हाला आलेला गोड अनुभव व आपलेपणानें आम्हास हरतऱ्हेनें मिळालेले सहाय्य खरोखरच कौतुकास्पद आहे.

प्रकाशनाची कल्पना आविष्कृत केल्यापासून आज पुस्तक हातावेगळें करीपावेतों ज्यानी ज्यांनीं आम्हांस निरपेक्ष सहाय्य केलें त्यांची कितीही नांवनिशी घेतली तरी ती अपुरीच पडेल, तरीपण ज्यानी आम्हाला प्रत्यक्ष सहाय्य केलें त्यांचा प्रामुख्यानें येथें नामनिर्देश केल्याशिवाय रहावत नाहीं. 'प्रवासी' पत्राचे संपादक सुप्रसिद्ध साहित्यसेवक श्री. गो. गो. अधिकारी यांनीं प्रस्तुत पुस्तक म्हणजे ' महाराष्ट्र–प्रकाशन–संस्थेचेंच ' अपत्य या भावनेनें दाखविलेली कळकळ व रामकृष्ण प्रिंटिंग प्रेसचे सुविद्य चालक व मालक श्री. बाबुराव सापळे यांनीं आरंभापासून पुस्तक सर्वांगसुंदर निघण्यासाठीं घेतलेले परिश्रम, याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

चित्रकार एम् सदाशिव व वसंतराव आंबेरकर यांनीं विनामूल्य, मोठ्या हौसेनें [illegible] आपल्या बिनमोल कलाकृती आम्हास दिल्या. ' मनोरंजनाच्या ' संपादिका कु. लीलाबाई मित्र व ' विविधवृत्ताचे' श्री. चं. वि. बावडेकर यांनींही आपआपल्यापरी सहाय्य केल्याबद्दल या सर्वांचे आभार मानणें उचितच होय. कवि दत्तप्रसन्न कारखानीस यानीं, आम्ही इच्छा प्रदर्शित करतांच, आपल्या सुंदर कवन–संग्रहाचें प्रकाशन आम्हास दिलें याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहे.

महाराष्ट्र शारदेच्या या प्रकाशनमंदिरात, एक स्त्री प्रकाशिका प्रथमच पाऊल टाकीत असून रसिकाच्या आपुलकीच्या सहानुभूतिपूर्ण सहाय्याची अपेक्षा करीत आहे हें ध्यानीं आणून, या संधि–प्रकाशांतून ' **क्षितिजावर** ' पाहावें एवढेंच—

यशोदा भुवन, हिंदु कॉलनी,
दादर, मुंबई.
१५ मे १९३५

सौ. उषा जोशी ( रुईकर )



सौ. उषा जोशी ( रुईकर )

# अंतरंग

काव्यशान्ताच्या रमणीय वातावरणानें माझ्या भावप्रवण मनाला — जरी वर्षांच्या दहाव्या–आकराव्या वर्षांच मोहिनी घातली असली, तरी उजळ माथ्यानें या ‘ जादूच्या जगांत ’ पदक्षेप केल्यास, आज उणेपुरें एक तप होत आहे ! — बारा वर्षांची खडतर तपश्चर्या फळास येते असें पुराणान्तरीं वाचीत आलों; परन्तु स्वच्छन्द स्वैर तपश्चर्येचें मोल देखील या व्यवहारी दुनियेंत सुन्दर रीतीनें होऊं शकते, याची प्रत्यक्ष प्रचीति मिळेल अशी कल्पना देखील नव्हती !

या अनपेक्षित फलप्राप्तीनें, माझी मति संभ्रमित पावून, ‘ क्षितिजांगणें ’ पाऊल टाकतांना स्वभावसुलभ संकोच वाटणें साहजीकच आहे.

अगदीं बाळपणापासूनचे माझे जिवलग स्नेही श्री. रामचन्द्र काशीनाथ जोशी ( रुईकर ) व त्यांच्या प्रेमळ पत्नी सौ. उषाताई जोशी, यांच्या दिलदार धाडसामुळेंच ‘ क्षितिजावर ’ येण्याचें भाग्य, आज मला लाभत आहे.

माझ्या या काव्य–कन्यकेच्या नामाभिधानापासून तों तहत ती रसिकाच्या हातीं देण्यापर्यंतचे सर्व सुखसोहाळे, याच हौशी जोडप्यानें, आपुलकीच्या आत्यन्तिक भावनेनें पार पाडल्यामुळें, ती त्यांची मानसकन्या आहे असें म्हणणेंच सयुक्तिक ठरेल. या त्यांच्या हार्दिक कृपाबद्दल, त्यांचे शाब्दिक आभार मानण्यापेक्षां मौन स्वीकारण्यांतच जास्त औचित्य वाटतें.

मित्रांच्या बाबतींत मी एकंदरींत भाग्यवान तर खराच, — कितीतरी मित्रांनीं स्वयंस्फूर्तीनें सर्वतोपरी आम्हास साहाय्य केलें. स्थलाभावास्तव सर्वांचाच उल्लेख करितां आला नाहीं तरी, सन्मित्र श्री. यशवन्तराव जगदाळे, श्री. प्र. श्री. कोल्हटकर, श्री. चन्द्रकांत वि. बावडेकर, कविमित्र ‘कुमार गोरा’ श्री. वि. रं. कुळकर्णी, कवि श्री. सरोजसुहृद् व श्री. द. वि. गुप्ते ( कवि काव्यकुसुमानंद ) यांचे आभार मानणें अगत्याचें आहे. प्रस्तुत कवन–संग्रहाच्या हौशी व धाडसी प्रकाशिका सौ. उषाताई जोशी, यांच्या या प्रथम प्रकाशनाचें सक्रीय कौतुक महाराष्ट्र-रसिकांकडून झाल्यास, माझा आनन्द द्विगुणित होईल हें सांगावयास कां पाहिजे ?

३९ माधवजी ठाकरसी इस्टेट,
दादर, मुंबई. ११ मे १९३५.

रसिकाचा नम्र,
**दत्तप्रसन्न कारखानीस.**

# दिग्दर्शन

आजकाल एकाद्या कवीच्या काव्याचा संग्रह प्रसिद्ध होणार असल्याचें वृत्त जाहीर झाले म्हणजे 'लोक काय बोलतात' या सदराखालीं न छापता येण्यासारखी भाषा बरेचसे लोक बोलूं लागतात. काव्यसंग्रहाची आवश्यकता काय, त्याची जरूर आहे कोणाला—वगैरे प्रश्न या ' चिंतातुर जंतुं ' च्या उपद्व्यापी डोक्यांतून सैरावैरा नाचूं लागतात जणुं कांहीं या पुस्तकांच्या मुद्रणाच्या खर्चाची जबाबदारी सर्वस्वी यांच्याच खिशावर येऊन पडलेली आहे. प्रस्तुत कवनसंग्रहातील '**भावना आणि व्यवहार**' ( पान ४१ ) या विनोदी कवितेंत एकाद्या कवीच्या काव्याकडे पहाण्याची त्याच्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीची दृष्टि कशी वेगवेगळी असते याचें सुंदर व समर्पक चित्र रंगविलें आहे. कवीच्या चिमुकल्या धाकट्या भावाला कवितेचा अर्थ न कळला तरी आनंद होतो, वहीण कल्पनासौंदर्यावर व शब्दमाधुर्यावर खूष असते; थोरला भाऊ मासिकाचा अंक फुकट वाचावयाला मिळतो एवढ्याच लभ्यांशावर संतुष्ट असतो तर आपल्या चिरंजीवाना हे रिकामटेकडे धंदे कसे सुचले म्हणून वडील चडफडूं लागतात. कुटुंबातल्या कुटुंबांत ही स्थिति तर बाहेरच्या तिऱ्हाईत वाचकांचे एकाद्या कवीच्या कृतीसंबंधीं काय उद्गार निघत असतील याची न सांगताच कल्पना येण्यासारखी आहे. गावात दुसऱ्याची घरें मुलांबाळांनीं आधींच गजबजली आहेत म्हणून बाकीच्या सांसारिकांनीं संततिनियमन केलें पाहिजे असा आग्रह धरणें म्हणजे निव्वळ जुलूम आहे. शाळेंत मुलांची फार दाटी झाली आहे म्हणून कोणाला वाईट वाटत नाहीं; ( दुसऱ्या शाळेच्या चालकाशिवाय ) फुलमाळ्यांच्या दुकानांत फुलांची फार गर्दी उडाली आहे म्हणून कोणीही गिऱ्हाईक तक्रार करीत नाहीं. मग वाङ्मयात काव्यपुस्तकाची मात्र फार खेंचाखेंच झाली आहे अशी विनाकारण ओरड करण्यांत काय हाशील आहे ? फुलांचा, मुलांचा व कवितांचा कंटाळा करणाऱ्या ' माणसा ' ची रवानगी एकाद्या संन्याशाच्या मठांत करण्याऐवजीं पांजरपोळांत करणें अधिक योग्य होईल म्हणून मराठी काव्यसृष्टीच्या ' **क्षितिजावर** ' उगवलेल्या या नूतन आल्हाददायक काव्यसंग्रहाचें कोणीही रसिक उत्फुल्ल मनानेंच स्वागत करील !

प्रस्तुत संग्रहाचे कवि श्रीयुत **दत्तप्रसन्न कारखानीस** हे मराठी कवितेच्या वाचकाच्या चांगल्याच परिचयाचे आहेत एकत्रित स्वरूपांत त्यांच्या कवितांचा हा संग्रह प्रथमच ' क्षितिजावर ' येत असला तरी त्यांच्या प्रतिभेच्या तेजस्वी शलाका रसि-

मना यापूर्वीच अनेकवेळां दृग्गोचर झालेल्या आहेत. नामांकित मराठी मासि- कांतून व नियत्कालिकातून त्यांच्या स्फुट कविता गेल्या दहा वर्षांत वेळोवेळीं प्रसिद्ध झालल्या असून त्यांच्या कवितांचे वेंचे कांहीं निवडक काव्यसंग्रहांत यापूर्वी घेतलेले आहेत. अशा तऱ्हेनें मराठी काव्यवाचकाचे व त्याचे संबंध पुष्कळच आपुलकीचे व घरोब्याचे असताना

> ' साशंक चित्त बावरें भरें कांपरें
> क्षितिजावर यायाला कां संकोच वाटतो बरें ? ' ( पान. १ )

अशा तऱ्हेची त्याची भयकातर व संदेहाकुल मनोवृत्ति क्षणमात्रही होण्याचें वस्तुतः काहींच कारण नाहीं. तथापि, एऱ्हवीं घरात नि शंकपणें व मनमोकळ्या वृत्तीनें वागणारी कन्यका विवाहसमयीं सुंदर वस्त्रें व सुवर्णालंकार अंगावर घालून आली म्हणजे परिचयाच्या मंडळीपुढें देखील लाजू मुरडूं लागते. हीं मनःस्थिति लक्ष्यांत घेतली म्हणजे कवीची उपरिनिर्दिष्ट संकोचवृत्ति ही अपरिचयामुळें उत्पन्न झालेली नसून विशिष्ट प्रसगाच्या अपूर्वतेमुळें उद्भवलेली आहे हें उघड आहे.

या कवितासंग्रहात एकंदर ५३ कविता समाविष्ट झाल्या असून त्या वरवर चाळणारासही एक गोष्ट स्पष्टपणें लक्ष्यांत येण्यासारखी आहे. ती ही कीं, श्री. कार- खानिस हे कोणाही एका विवक्षित कवीचे किंवा पंथाचे अनुयायी नाहींत. कै. गोविंदाग्रजांशीं त्याचें जवळचें नातें असूनही त्यांच्या काव्यवैशिष्ट्याचे किंवा पद्ध- तीचे हेतुपूर्वक अनुकरण करण्याचा त्यांनीं मोह आवरला हें त्यांना खरोखरच भूष- णावह आहे. त्याचप्रमाणें एका विशिष्ट विषयालाच प्रामुख्यानें कविता वाहण्याची प्रथा पुष्कळ आधुनिक कवींमध्यें आढळून येते तिचाही श्री. कारखानीस यांनीं अवलंब केलेला नाहीं. परभाषेंतील काव्यांचें भाषांतर करून ' नाव ' कमाविण्याचें वेड आजकालच्या कवींमध्यें पुष्कळच कमी झाले आहे हें जरी खरें असलें तरी स्फूर्ति शिलगाविण्यासाठीं तरी पुष्कळ कवींना विलायती आगकाड्या वापराव्या लागतात. श्री. कारखानीस असला उपद्व्याप करण्याच्या खटपटींत पडले नाहींत ही आनंदाची गोष्ट आहे. समकालीन कवींच्या काव्यलेखनपद्धतीच्या काहीं लकबा व वैशिष्ट्ये यांचा किंचित् पडसाद त्याच्या काव्यांत क्वचित् कोठें पडलेला आहे हें सूक्ष्म दृष्टीनें वाचणारास आढळून येईल—आणि तें अपरिहार्यही पण आहे, हें कोणीही कबूल करील. तथापि, सामग्र्यानें पहातां श्री. कारखानीस याची प्रज्ञा व प्रतिभा स्वयंप्रकाशी असून त्यांच्या कल्पनाचे आणि रचनेचें स्वातंत्र्य व वैशिष्ट्य लक्ष्यात येण्याइतकें ठळक आहे हें कोणीही कबूल करील.

श्री. कारखानीस हे ' **क्षितिजावर** ' येण्यापूर्वी कितीतरी आधीं त्यांच्या ज्या कवितेनें वाचकांना जागें करून त्यांच्या प्रभावी कवित्वाची जाणीव करून दिली ती कविता म्हटली म्हणजे '**कोंबडा**'. ( पान ३५ ). नाहीं तरी निजलेल्या लोकांना जागें करण्याचें काम कोंबडा करीत असतोच ! बालमनांशीं समरस झाल्याशिवाय ' कोंबड्या 'सारख्या अत्यंत गद्य व प्राकृत पक्ष्यासंबधीं आकर्षण वाटणें शक्य नाहीं हें उघड आहे. विशेषतः, कोंबड्याच्या डोक्यावर हालणाऱ्या लालभडक तुऱ्याला बघून आस्वदीच्या फुलाची आठवण होणें किंवा त्याच्या पायावरचा पांढरा फुगार भाग बघून ती लाडी विजार आहे आणि त्यामुळें तो जसा काहीं पक्ष्यांमधला फौजदार आहे अशी कल्पना सुचणें यावरून श्री. कारखानीस यांची अवलोकन-शक्ति किती सूक्ष्म व मार्मिक आहे हें स्पष्ट दिसून येतें; ' **इंद्रधनु** ' ( पान २ ), ' **नवें बाळ** ' (पान२६ ), ' **छोट्या बहिणीस–**' ( पान ३७ ) या कवितामध्यें मुलाच्या निर्व्याज मनोहर भावनांशीं एकरूप होण्याइतकी वत्सलता कविच्या अंतः-करणांत आहे ही गोष्ट प्रतीत होत असली तरी यौवनसहज प्रणयभावनांच्या उन्मादक विलासवाटिकेंतून विहार करताना कवीची स्फूर्ति अननुभूत आनंदाच्या रोमांचानीं अधिक उत्फुल्ल होते ही गोष्ट नाकबूल करता यावयाची नाहीं. ' प्रेम हा श्री. कारखानीस यांच्या प्रतिभाशक्तिचा ' ऐच्छिक विषय ' दिसतो. ' प्रणयगीत ' म्हटल्यानंतर बऱ्याचशा ढोंगी प्रौढाच्या आणि विघ्नसंतोषी वृद्धांच्या कपाळावर सुरकुत्या जमा होण्याचा संभव आहे. हल्लींच्या काळीं राष्ट्रीय भावना खळबळून सोडणारीं व वीररसानीं रसरसलेली म्हणजे बहुदा बँडच्या चालीवरची व ' पाटणकरी ' आवेशाची जोरदार कवनें निर्माण व्हावयाला पाहिजेत असा या मंडळीचा मोठा हेका आहे. प्रेम व शृंगार म्हटला म्हणजे त्यात बायकी नेभळेपणा व ग्राम्य पाचकळपणा भरपूर आलाच पाहिजे असा ठाम सिद्धांत या लोकांनीं आपल्या उराशीं जतन करून ठेवलेला असतो. अशापैकीं बहुतेकांची मस्तकें पारंपरिक व रूढ कल्पनांच्या कुजकट अवशिष्टांनीं बुजबुजलेलीं, किंवा देशभक्तीच्या एकांतिक वेडानें फिरल्यामुळें सपशेल जायबदी तरी झालीं असतात अथवा वयाच्या अपरिहार्य वाढीमुळें म्हणा किंवा अकालीं प्रौढपणा आल्यामुळें म्हणा यांना बौद्धिक अवष्टंभ झालेला असतो आणि त्यामुळें संसारांत ज्या रसाच्या लज्जतदार अनुभवानें नवचैतन्य उत्पन्न होतें त्या रसाच्या नुसत्या वासानेंहि या हुरसलेल्या जीवाना संग्रहणीची व्यथा जडण्याचा संभव असतो.

शृंगार व वीररस हे परस्परांना मारक नसून प्रेरक व पोषकच आहेत. खमंग ... ूवर लिंबू पिळल्यानें त्याच्या तिखटपणांत देखील एक प्रकारची फर्मास रुचि उत्पन्न होते. शृंगाररस हा पौरुषाची जोपासना करतो व प्रणयाच्या प्रेरणेनेच वीरांच्या हातून पुरुषार्थाचे पराक्रम होतात. शृंगार हा मर्दांचा रस आहे; त्या मुळेच मर्दुमकीचे सार्थक होते; ही दृष्टी बाळगली म्हणजे, प्रणयगीतें रचणें हें एक अक्षम्य पाप आहे, असें त्या पापाचें जें खापर आधुनिक कवींच्या माथ्यावर फोडण्यात येतें तें किती अयोग्य आहे हें कळून येईल.

प्रणयकाव्यें रचावयास लागणारी मार्मिक रसिकता व नियंत्रित सूचकता श्री. कारखानीस यांच्या अंगीं आहे हें त्यांच्या या विषयावरील कविता वाचून पटण्यासारखें आहे रंगीबेरंगी साड्या नेसून सायंकाळीं फिरावयास निघणाऱ्या रूपसुंदर तरुणींचे आनंदी व हौशी थवे बघून

बेदर्द गुलाबी फौज
चालली कुठें ही आज ? — नच कळे ! (पान २०)

असे समर्पक उद्गार त्यांच्या मुखातून निघतात. लावण्याच्या गजांत लक्ष्मीची ही रुधड्यावर निघणारी मनोहर मिरवणूक बघून

ही झुंड पहाया गुंड शहरचे बंड कैक अलबेले,
जणु प्रफुल्लाब्जपथसरीं भृंगचय तुटले !

अशी अडचणीची परिस्थिति निर्माण होणें अपरिहार्य आहे म्हणूनच कवीच्या कातर मनात पुढील प्रार्थना अस्पष्टपणें गुणगुणली जावी हें साहजिकच आहे.

ईश्वरा ! — दया करि जरा — करी लव त्वरा—
फौज सांभाळ—नीट सांभाळ
नच जडो दृष्टि चांडाळ ! — ती वरी

सौंदर्याच्या अवलोकनानें दृष्टीचें व भावनाचे पावित्र्य कंपित होतां कामा नये ही कल्पना या काव्यात कवीनें सूचित केलेली आहे.

बालपणीं निर्व्याज वृत्तीनें खेळणाऱ्या अल्लड मैत्रिणीच्या मोकळ्या मनोवृत्तींत यौवनाच्या देहलीवर पाऊल पडताच एकदम बदल होतो.

बाल्याचा सखल प्रदेश सरुनी तारुण्यसीमेवरी
मुग्धत्वाभरणें खुलावट तुझी आली उताला पुरी;
बाल्यीं बालपणा अजाण विरला, गेलेंच साधेपण
आतां लागलि तोरणें फडकण्या येत्या नव्या सृष्टिचीं !

आणि म्हणूनच तिला पुढील प्रश्न विचारण्याचा मोह तिच्या बालमित्राला होणें अशक्य नाहीं.

आहे रोष तुझा जरी मजवरी चोरूनिया दर्शन
कां घेसी तुमजे, कटाक्ष मधुरे, कां फेंकिसी गोडसा ?

* * * *

कां बाले ! धरिसी, मनांत न कळे संकोचवृत्ती अशी
प्रीतीच्या पडद्यापल्याड घुमतें कीं गूढ संगीत हें ? ( पान ९ )

अर्थात् मैत्रिणीच्या वृत्तींत हा जो यौवनामुळें चित्ताकर्षक बदल झाला आहे तो ' सखोल वर्तन तुझें आतांच कां हे असें ? ' या प्रश्नामुळें तिच्या भावड्या कवि मित्राच्या ध्यानांत जरी येत नसला पाहिजे हें जरी खरें असले तरी तो चाणाक्ष वाचकाच्या नजरेंतून निसटण्यासारखा नसल्यामुळें कवीच्या निर्दोष व निष्कपट पण अजाण वृत्तीबद्दल क्षणभर हसूं आल्याशिवाय रहात नाहीं. ' **अव्यक्त प्रेम**' (पान ३८) या कवितेंत सकोचवृत्तीमुळें परस्परावरील ' प्रेम ' प्रकट करण्याचें धैर्य न झाल्यामुळें दोन जीव संसाराच्या विशाल दरियावर परिस्थितीच्या लाटामुळें एकमेकांपासून कसे दुरावले जातात व आमरण असुखी रहातात याचें हृदयस्पर्शी दृश्य कवीनें मोठ्या कौशल्यानें चितारलेलें आहे. समाजाच्या हल्लींच्या परिस्थितींत किती तरी हतभागी जीवाची प्रेमनिराशेमुळें दुर्दशा होत असेल ! ' **चित्तचोरटी** ' ( पान ५१ ) या कवनांत चित्रित केलेला प्रेममीलन प्रसंग जरी बहारीचा असला व प्रियेच्या दप्तरीं अर्ज नोंदविण्याची त्यांत वर्णन केलेली पद्धत जरी अभिनव असली, तरी असले अपूर्व प्रसंग सत्यापेक्षा कल्पनेच्याच सृष्टींत अधिक संभवत असल्यानें त्या कवितेपेक्षां ' **अव्यक्त प्रेम** ' या गीतांतील भावना तिच्या निष्ठुर खरेपणामुळें मनाला अधिक चटका लावते यांत शंका नाहीं.

दुर्वचनामुळें दुखावलेल्या कोमल भावनेच्या ' **प्रेमले** ' चें ( पान ४९ )

शिंपले दोन विनमोल गोड शोभले
ओंघळूनि माणिकमोती सितवर्ण दिसूं लागले !
मधु गंध जणूं दरवळे गुलाबी मळे,
त्या कपोल युगुल-प्रांतीं कारुण्य-मेघ ओपले !

हें करुण दृश्य जितकें हृदयंगम आहे तितकेंच, अबाड्यांत गुलाबाचा दळदार गेंद खोवून आलेल्या विधवेच्या भकास व विषण्ण सौंदर्याचें

शृंगारांकित देह हा तव मुसल्मानी गमे ताबुत ! ( पान ५८ )

हें वर्णन ' कटु सत्य ' असलें तरी योग्य नाहीं असें कोण म्हणेल ?

झोंपणें सांग गडे कुठवरी ? ' ( पान १० ) या कवितेतील पिठोरी चांदण्याचें वर्णन अत्यंत आल्हाददायक आहे.

स्वच्छ चांदणें पिठासारखें भुरभुरलें भूवरी
पखरण पारिजात जणुं करी
— ही झुळुक वायुची मंद मृदुल निर्झरी
शरिरास गुदगुल्या होति कुठुनशा तरी
रोमांच अचानक उठती देहावरी !
शुभ्र रुपेरी चादर अंगावरी पांघरुनि बरी
झोंपली शांत शांत शर्वरी !

स्वच्छ रुपेरी तलम चादर अंगावर घेऊन निशादेवी निश्चल निजली आहे ही शेवटल्या दोन ओळींतील चांदण्या रात्रीविषयींची कल्पना अत्यंत हृदयंगम आहे.

तथापि ' गोड अबोला' ( पान ५९ ) ही कविता श्री. कारखानीस यांच्या शृंगार काव्याचा मेरुमणि आहे. संसारांत प्रेमळ पतिपत्नीमध्यें देखील प्रेमाचें लटेबखेडे नेहमींच चाललेले असतात हें कोणीही ' तज्ञ ' मनुष्य कबूल करील. अशा कलह-प्रसंगीं अबोल्याचें राज्य कांहीं काळ सुरू होते आणि मग दोहोंपैकीं कोणी आधीं तहाची भाषा सुरूं करावी याबद्दल दोघांच्याहि स्वाभिमानी चित्तांत चोरटी चुरस उत्पन्न होते. अशा संशयपीडित मनःस्थितींत शय्येवर त्रेसष्टाच्या आंकड्याप्रमाणें तोंडे फिरवून पहुडलेलें हें दांपत्य निद्रेच्या उन्मादक प्रहरांत परस्पराच्या करपाशांत नकळत येऊन सामील होतें.

स्वप्नांत मारी हांक ती ' प्रिय नाथ ! ' भोळी भामिनी
अन् त्याच वेळीं स्वप्निं तो बोले ' प्रिये ! ' सोत्कंठुनी !

या कवितेंत हळुवार चातुर्यानें वर्णन केलेला संसारांतील रहस्योद्ग्राही प्रसंग प्रत्येक सांसारिक व रसिक वाचकाला आपल्या अनुभवाशीं पडताळून पहातां येण्यासारखा आहे. आयुष्याला आंबलेल्या सनातनी माणसानी ही कविता वाचण्याच्या बिलकूल भानगडीत पडूं नये; कारण अनुभवाच्या अभावीं त्याला हें वर्णन काल्पनिक व फारच उद्दीपक म्हणूनच ' अवाच्य ' वाटण्याचा संभव आहे. तरुण तरुणींच्या अंतःकरणांतील मधुर प्रणयभावनाच्या बारिकसारिक छटा श्री. कारखानीस हे

फारच जिव्हाळ्यानें रंगवितात हें खरें आहे. यामुळें त्यांच्या कवितेसंबंधी हौशी व रसिक तरुण स्त्रीपुरुषाना अधिक आपुलकी वाटेल यांत शंका नाहीं.

कल्पना–नाविन्याची आवड हें श्री. कारखानीस यांच्या कवितेचें दुसरें महत्वाचें वैशिष्ट्य आहे. ' पृथ्वी ही पापिणी आहे ' ( पान ५ ) या कल्पनेच्या समर्थनासाठीं विद्युल्लता, गारा व तारका या स्वर्गांतून खालीं आल्यानंतर पृथ्वीच्या स्पर्शानें नाश पावतात हा दिलेला पुरावा अभिनव आहे. निद्रादेवीला आजपर्यंत अनेक कवींनीं आपल्या गीतातून आवाहन केलें असेल. पण सृष्टिसौंदर्यावलोकन, ग्रंथाध्ययन व समवयस्क मित्रांसमवेत काव्यशास्त्रचर्चा या सुखांचा आस्वाद आपणाला अधिक उत्कटतेनें मिळावा म्हणून जगातील दुसऱ्या अनेक दुःखी जीवाची तळमळ शांत होण्यासाठीं निद्रादेवीनें तिकडे जावें म्हणून तिला विनति करणें ही कल्पना अपूर्व व हृद्य आहे

चिन्ताग्रस्त कितीक जीव असती या भव्य विश्वांतरी
दुर्दैवी तुजवीण कठिति जिणें जीवन्मृताचेपरी !
—जा; जाऊनि तयांस भेटुनि करी त्यांचें सुखी जीवन;
निद्रे, लाभ कळे न काय तुजसीं माझ्यासवें राहून ! ( पान ३४ )

दीपप्रकाशाची प्रशंसा करताना ( पान ३३ ) विद्वान पंडित व कवि रात्रीच्या वेळीं दिव्याच्या प्रकाशांत आपले लेख व काव्यें लिहितात या दिव्याच्या उपकारासंबंधीं वाचकात दुमत होण्याचा संभव आहे तथापि प्रणयमग्न तरुण–तरुणींच्या शृंगार-चेष्टादि लीला पहाण्याचें भाग्य दिव्याला लाभतें ( अर्थात्, कधीं–कधीं ! ) या मनो-हर कल्पनेनें कांहीं जिज्ञास वाचकाच्या पोटांत दिव्याबद्दल मत्सर भडकण्याचा संभव आहे. ' **जगाचा न्याय** ' ( पान ६९ ) किती विपरीत असतो हें वर्णन करताना ज्या मेघानें आपल्या प्रियतमेसाठीं स्वदेहाच्या चिंधड्या केल्या त्या मेघाला सोडून त्याची वल्लभा विद्युलता जमिनीवरच्या लोखंडाच्या गळ्यांत जाऊन पडते ही कल्पना तिच्यातील शास्त्रीय सत्यामुळें हृदयंगम वाटते. आज-पर्यंत चालत आलेले कवि सृष्टींतील अद्भुत काल्पनिक संकेत सोडून देऊन कवींनी प्रस्तुतच्या शास्त्रीय ज्ञानामुळें बदलेल्या जगाच्या विचारांना पटतील असे आधुनिक संकेत प्रचारात आणावेत असें म्हणणाऱ्यांचा एक पक्ष हल्लीं अस्तित्वांत आलेला आहे. तथापि नवीन संकेत एकदम अंमलांत आणल्यानें अपरिचयामुळें साधर्म्य चटकन् लक्षात येत नाहीं व त्याचा परिणाम—' तूं भृंग । जीवन–चलन–स्प्रिंग '

अशा हास्यास्पद ओळीच्या रचनेंत होतो. त्यापेक्षां श्री. कारखानीस यांनीं वीज व लोखंड यांच्या शास्त्रीय संबंधावर उभारलेली कल्पना चटकन् मनाला पटते व तीपासून आनंदनिष्पत्ति होते; संसारांत ' जोडी 'चें सुख काय आहे ( पान ७४ ) याचें रसभरित वर्णन करतांना चन्द्र व सूर्य एकएकटे आकाशात हिंडतात म्हणून एक खंगत चालला आहे व दुसरा जळतो आहे ही कवीची कल्पना सुंदर आहे. पोपट पिंजऱ्यात अडकून पडला आहे या विषयांवर अनेक कवींचा आजपर्यंत कंठ फुटला असेल. स्वातंत्र्याच्या वातावरणात स्वच्छंदानें विहार करण्याचा ज्याचा जन्मसिद्ध भाग्यशाली हक्क त्याच्या नशिबीं दैवदुर्विलासानें बंदिवास पडावा याबद्दल अनेक कवींनीं आजपर्यंत कारुण्यपूर्ण किंकाळ्या मारल्या असतील पण--

गिरिगव्हरिं हिण्डता व्याध-शर अवचित बसतां उरीं
स्वातंत्र्याच्या तरल कल्पना विरतिल वाऱ्यावरी ! ( पान ७० )

ही ' स्वातंत्र्याची ' पुष्कळशी खरी बाजू आजपर्यंत कोणत्याही कवीनें भोळ्या भाबड्या पोपटापुढें मांडली नसेल. कदाचित् ही कविता वाचून कांहीं निर्भेळ स्वातंत्र्यवादी आत्म्याना जबरदस्त धक्का बसेल. ' स्वराज्य आलें म्हणजे इतर कांहीं कां फायदे होणार असले तरी आमच्या पेनशनीचें काय होणार-म्हणून आहे तेंच ठीक आहे ' असें म्हणणाऱ्या एकाद्या सरकारजमा जीवाच्या उद्गारांशी कवीच्या या कवितेची तुलना देखील कांहींजणाकडून केली जाईल. तथापि आत्मसंरक्षणाचें सामर्थ्य अंगात आल्याशिवाय स्वातंत्र्याचा लाभ होण्यानें, उद्धारापेक्षां नाशच जास्त संभवनीय आहे ही कवीनीं सूचित केलेली कल्पना चिंत्य नाहीं असें कोण म्हणेल ?

' **कालाय तस्मै नमः** ' ( पान १७ ) या कवितेंत वसंतगडाच्या दर्शनानें स्फुरण पावलेल्या कविकल्पनेचा विलास खरोखरच उदात्त व मनोहर आहे. छत्रपतींच्या वैभवशाली काळांत जर आपण जन्माला आलो असतो तर आजच्या आपल्या ऐन ज्वानीच्या आयुष्यांत केवढें तरी अंतर पडलें असतें असा कवीच्या मनांत विचार येतो. कदाचित् आपल्याला त्यांनीं त्या गडाचा किल्लेदारही केले असते.

वारू सुन्दर उंच एक अरबी, मंदीलही भर्जरी—
देतां रत्नविभूषिता तळपती तल्वार माझे करीं !

असा महाराजानी आपला गौरव केला असता; व दरबारांतील मानकऱ्यांच्या समक्ष आपण छत्रपतींना मुजरा करून शिवसेवेचें पवित्र व्रत घेतले असते आणि मग—

जातांना मुजरा करुनि विनयें, होऊनि अश्वारूढ,
खोवोनी समशेर मी कटिं, निघे गाठावयातें गड !
माझी प्राणसखी सुहास्यवदना पंचारती घेउन
दुर्ग–द्वारिं सहर्ष वाट बघती सोत्कंठ उल्हासुन !

असें आपलें गडाच्या दरवाजावर रोमहर्षण स्वागत झालें असतें.

' निराशेचे खाऊनि लाख टोले
चित्त माझें दिनरात्र पेटलेलें '

असें कवीनें आपल्या मनःस्थितीचें वर्णन केलें आहे; व या मनःस्थितींतून आपल्या या कवित्वाचा उगम झाला आहे असें त्यांचें म्हणणें आहे. कोणत्या कार्य-क्षेत्रांत काय कारणामुळें कवीची एवढी निराशा झाली असावी हा प्रश्न वैयक्तिक असल्यानें त्या संबंधी वाचकांनीं विनाकारण जिज्ञासा दाखविणें हें भलेपणाचें लक्षण ठरणार नाहीं. तथापि वाचकाच्या सुदैवानें श्री. कारखानीस यांच्या मनाची प्रवृत्ति आत्मलक्षी ( Subjective ) नसल्यानें त्यांच्या आंतरिक निराशेची मलिन छाया त्यांच्या काव्यावर कोठेंही पडलेली नाहीं. उलट, त्यांच्या विचाराचा कल आपल्या अनुभवाचें पडताळे इतरांच्या मार्गदर्शनासाठीं देण्याइतका आशावादी दिसतो. म्हणून त्यांच्या कवितांचा ध्वनि उत्तेजक वाटतो.

देव असो दैत्य असो
नर नारी जीव असो
भेटुनि परी एकवार, त्यास जावयाची ! ( पान ८ )

कोणत्याही मनुष्याच्या आयुष्यांत केव्हां ना केव्हां तरी भाग्योदयाची संधी येतेच येते हें त्यांनी केलेलें **'संधी'**चें वर्णन उत्साहप्रेरक नाहीं असें कसें म्हणता येईल ? जी वस्तु या जगांत साध्य नाहीं तिचा निष्कारण हव्यास धरून मनाला कांचणी लावून घेण्यांत कांहीं अर्थ नाहीं (पान १४) ही त्यांनी **'भाबड्या जीवा'**ला दिलेली उपदेशाची प्रेमळ ताकीद अनुभवाला पटण्यासारखी आहे. जगाच्या **' पडद्याआड '** काय चाललें आहे याची निष्कारण चिकित्सा व चौकशी करूं नये ( पान २२ ) हा त्यांनी केलेला उपदेश सवंग लोकशाहीमुळें उत्पन्न झालेल्या अंदाधुंदीच्या या काळांत तर फारच उपयोगी पडण्यासारखा आहे. **' आपुलकी '**च्या प्रेमामुळें जगांतील जीवनाला मोल आलेलें आहे. ( पान २ व ७५ ) जगांत विषमता ठिक-ठिकाणीं वसत असल्यामुळें दुसऱ्याच्या वैगुण्याचा उपहास करणें बरें नाहीं; (पान २७) हे कवीनें प्रकट केलेले विचार त्यांच्या औदार्याची व व्यापक दृष्टीची साक्ष देतात.

विनोदी लिखाण लिहिल्यानें किंवा विडंबन काव्यें लिहिल्यानें अत्यंत सुलभ मार्गानें व्यापक प्रसिद्धी मिळते अशी हल्लींच्या काळीं बऱ्याचशा पद्यलेखकांची समजूत झालेली दिसते अर्थात या समजुतीच्या पोटीं, विनोद निर्माण करणें किंवा विडंबन कविता लिहिणें म्हणजे तोंडांतून जीभ बाहेर काढून वेडावण्या दाखविण्याइतकी सोपी गोष्ट आहे ही एक कल्पना असतेच. यामुळें हल्लीं विडंबन गीतांची विलक्षण टोळधाड महाराष्ट्र वाङ्मयावर आलेली आहे. या संकटकालीं अनेक जातिवंत कवींची तात्पुरती तरी मुस्कटदाबी झालेली आहे. याबद्दल मराठी वाङ्मयाच्या हित-चिंतकांना मनापासून विषाद वाटणें साहाजिकच आहे. श्री. कारखानीस यांनींही या प्रवृत्तीबद्दल आपली नापसंती स्पष्टपणें व्यक्त केली आहे ( पान ६७ ). तथापि, विडंबन म्हणजे काय याची त्यांना स्वत:ला चांगली कल्पना आहे व याचा एकच नमुना त्यांनीं वाचकापुढें मांडला आहे ( पान ४१ ). तो विशेषत: मुंबईच्या परि-स्थितीला उद्देशून असल्यामुळें ' रामा ' च्या आधीन झालेल्या अनेक मुंबईकरांना पटण्यासारखा आहे.

श्री. कारखानीस यांना आयुष्यांत कटु निराशेच्या वाटा जर आला असेल तर त्याच्या कडवटपणाची विशेष जाणीव त्याच्या '**नरपिशाच्च**' ( पान २१ ) व '**कावळ्यास—**' ( पान ६१ ) या दोन कवितात प्रत्ययाला येते. ' जगांतील कोणतेही भेसुर दृश्य किंवा भयकर प्रसंग बघून आपल्याला भय वाटत नाहीं पण

तोण्डावरती हास्य विमोहक
हृदन्तरीं हालाहल दाहक
नरपिशाच्च परि पाहुनि असलें अन्तर धडधडतें !

कोणाच्याही व कोणत्याही देवाला न भिणारी व जगाच्या रहदारीतून दिवसा-ढवळ्या फिरत असतांना पदोपदीं भेटणारी हॅम्लेटच्या चुलत्यासारखी ' One may smile and smile and be a villain ' या वृत्तीचीं नरपिशाच्चें कोणी पाहिलीं नसतील ? खरीं भूतें कोणीही पाहिली नसतील पण ' हीं ' भूतें जगांत दुर्दैवानें प्रत्येकाला पहावयास मिळतात !

' सुन्दर शुभ कांहिं जिथें
टाकूं विष-बिन्दु तिथें '
अवगत तुज एकाक्षा ! कुटिल नीच-लीला !

अशा प्रवृत्तच विप्रसंतोषी कावळे पहाण्यासाठीं पिंपळाच्या फांद्याकडेच मान करून बघायला नको !

जगांतील 'विजोड जोड' बघून (पान ६०) कवीला अत्यंत वाईट वाटतें. चैत्रमासांत हळदी-कुंकवाला जाणाऱ्या स्त्रिया बघून एका अजाण बालिकेनें 'तूं कां जात नाहींस?' असा आपल्या गतधवा मातेला केलेला हृदयभेदक प्रश्न ऐकून (पान २९) ते जडमूढ होतात. तथापि, सामाजिक अन्यायाच्या संशोधनासाठीं जागरूक असलेल्या त्यांच्या दृष्टीला जेव्हा एक वंचित तरुणी अब्रूच्या संरक्षणासाठीं, आपल्या लहानग्या अर्भकाचा निरोप घेतांना त्यांना दिसते (पान ६२) तेव्हां त्यांची कारुण्यवृत्ति पूर्णपणें उचंबळून येते व त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंचे लोट वाहूं लागतात. या करुणरसपूर्ण कवितेंत त्यांच्या कवित्वशक्तीचा उत्कर्ष झालेला आहे.

'स्वजनन माझिया उदरीं
परि माय म्हणविण्या चोरी !
मृदु माया-पांखर आतां कुठुनि तुला लाभणार ?'

हें त्या दुर्दैवी मातेचे उद्गार ऐकून कोणाचें हृदय दुःखावेगानें भडभडून येणार नाहीं ?

'पशुपक्षी फिरती रानीं
निज पिलांस चारापाणी —
आणिती, पांखरा ! माझ्या कोण तुला पाहणार ?'

रानावनांतील पक्ष्याच्या मादीला देखील जी मायममतेची पांखर आपल्या पिलावर निःशंकपणें घालता येते, ती बुद्धिप्रधान मानवी समाजांतील मातेला आपल्या अर्भकावर टाकण्याची देखील चोरी असावी या अन्यायाचें निराकरण समाजशास्त्रज्ञ कोणत्या तोंडानें करतील ? मृत बालकाबद्दल शोक करणाऱ्या आईच्या विलापापेक्षां जन्मलेल्या अर्भकाला समाजाच्या समजुतीसाठीं स्तनापासून तोडून दूर टाकणाऱ्या दुर्दैवी मातेचा हा हंबरडा जास्त हृदयभेदक आहे असें मला वाटतें.

श्री. कारखानीस यांच्या सर्व कविता गेय चालीवर असल्यामुळें न गाता येणाऱ्या माणसालादेखील त्या स्वतःशीं गुणगुणतां येण्यासारख्या आहेत. त्यांची भाषा सोपी, वेचक व अर्थपूर्ण असून रचना रेखीव व प्रसादपूर्ण आहे. ध्वनिसंगीताकडे त्यांनीं कित्येक ठिकाणीं विशेष लक्ष्य पुरविलें असल्यामुळें त्या कविता म्हणतांना विशेष नादमाधुर्य प्रतीत होण्यासारखें आहे.

साथ मंजुळालापांनीं विहगगण करील !

ताल वाल निर्झर झुळझुळ वाहुनी धरील !

पर्णभार-आंदोलनिं तरु सूर काढतील !

विपिन भाग जावो धुमुनी मधुर गायनानीं !

हें निर्जन वनसौंदर्याचें वर्णन [ पान १२ ] किंवा,

इवलिशी रम्य नासिका, अधर चिमुकले

लुसलुशीत कोमल गालीं डंवरलीं गुलाबी फुलें !

मुखमण्डल सुन्दर खुलें लाल गोजिरें

मुठि घट्ट आवळुनि वेडें करिं निश्चय कसला बरें ! (पान २६)

हें ' नव्या बाळा 'चें त्याच्या चिमुकल्या बहिणीनें रगविलेलें मनोहर शब्द-चित्र वरील विधानाचें द्योतक आहे. आतांपर्यंत दिग्दर्शित केलेले श्री. कारखानीस यांच्या कवित्वशक्तीचे हे निरनिराळे उन्मेष साकल्यानें लक्ष्यात घेतां असें म्हणतां येईल कीं, त्यांच्या कवितेंत भावनेचा जिव्हाळा, कल्पनेचें नाविन्य, भाषेचा प्रसाद व रचनेचें माधुर्य हे गुणविशेष प्राचुर्यानें आढळून येतात. म्हणून 'क्षितिजावरी'ल त्यांचें हें आगमन मराठी वाचकांना खचित आल्हादकारक व आशादायक वाटेल यांत शंका नाहीं. ' क्षितिजावर ' उदित होणाऱ्या तेजाचें स्वागत करण्यासाठीं रसिक ' चंडोल ' आकाशांत भराऱ्या मारीत असतात तर गांवठाणाच्या काटेरी कुंपणावर तिकडे कुटाळ कावळ्यांचीही कावकाव चाललेली असते. कारणावाचून वैर करणाऱ्या मडळीच्या दावेदारीचें भय बाळगण्याचें (पान ७६) आत्मर्चित-नाच्या तद्रींत दंग असलेल्या कवीला अर्थातच कांहीं कारण नाहीं. ज्या क्षितिजावर कवीनें पदार्पण केलें आहे तें क्षितिज पश्चिम दिशेचें नसून पूर्वेचेंच आहे आणि म्हणून उदित प्रकाशाचा यथाकाल अधिकाधिक विस्तारच होणार आहे असा निर्वाळा या संग्रहातील दोन चार कविता वाचूनही कोणाला देता येईल याविषयीं संदेह नाहीं. उष:कालच्या मंगल घटिकेला श्री. कारखानीस यानी **'क्षितिजावर'** उभारलेल्या आपल्या काव्याचा हा ध्वज रसिकाच्या उत्तेजनाच्या अनिललहरींत

फडफडेल गगनीं ! घुमविल दिव्य यशोगान !

अशी आशा करणें व्यर्थ होणार नाहीं.

पुणें ता. ७।५।१९३५

**प्रल्हाद केशव अत्रे.**

# अनुक्रमणिका


| कविता | पृष्ठ | कविता | पृष्ठ |
|---|---|---|---|
| क्षितिजावर— ... | १ | भावना आणि व्यवहार ! | ४१ |
| ऋणानुबन्ध ! ... | २ | निद्रिस्त बाळास— ... | ४३ |
| इन्द्र — धनु. ... | ३ | सुगृहिणी ! ... ... | ४५ |
| पापिणी पृथ्वी ! ... | ५ | नाम–लेखन ! ... | ४७ |
| सन्धि ! ... | ७ | प्रेमले—! ... ... | ४९ |
| आताच कां हें असें ? ... | ९ | विमान ... ... | ५० |
| झोंपणें साङ्ग गेंड ! कुठवरी ? | १० | चित्त–चोरटी ! ... | ५१ |
| रमूं ये प्रेम–संसारीं ! ... | ११ | मोर–पिसारा ! ... | ५३ |
| जाउं दूर रानीं...! ... | १३ | दसरा ... ... | ५५ |
| भावड्या जिवा—! ... | १४ | ही पहा दिवाळी आली वैभवशाली | ५७ |
| निस्तेज चन्द्रास—! ... | १५ | कटु सत्य ! ... ... | ५८ |
| कालाय तस्मै नमः ! ... | १७ | गोड अबोला ! ... | ५९ |
| गुलाबी फौज ! .. | २० | बन्धन ! ... ... | ६० |
| पडद्याआड ..! ... | २२ | कावळ्यास— ... | ६१ |
| हुङ्गलेलें फुल ! ... | २३ | ‘ तुज टाकुनि जातें बाळा—’ | ६२ |
| नवें बाळ ! ... | २६ | विजोड जोड ! ... | ६४ |
| विश्वातील विषमता ! ... | २७ | महाभागा मृत्यो...! ... | ६५ |
| मैनेस— ... ... | २८ | ‘ का गातसां स्त्री–जातिला ?’ | ६६ |
| सवाल ... ... | २९ | घुबडा ! व्यर्थ तुझा घूत्कार ! | ६७ |
| नर–पिशाच ! ... | ३१ | जगाचा न्याय ! ... | ६९ |
| दीप–जीवित ... | ३२ | बन्दिवान पोपटा...! ... | ७० |
| निद्रेस—! ... | ३४ | हुरहूर ... ... | ७१ |
| कोम्बडा ! ... ... | ३५ | सोक्ष–मोक्ष ! ... | ७३ |
| छोट्या बहिणीस— ... | ३७ | जोडी ! .. ... | ७४ |
| अव्यक्त प्रेम ! ... | ३८ | आपुलकी ... ... | ७५ |
| औरंगजेब आणि शिवाजी | ४० | अकारण वैर !... ... | ७६ |

# क्षितिजावर

# काव्यगान !

[ वृत्त:-दिण्डी ]

निराशेचे खाऊनि लाख टोले
चित्त माझें दिनरात्र पेटलेलें !

अग्नि-ठिणग्या झडतात त्या मधून
गमे जनतेला मधुर काव्यगान !

२८ जानेवारी १९३४
दादर, मुम्बई.



कवि दत्तप्रसन्न कारखानीस.

५३५१

# क्षितिजावर–

[ जाति –मुद्रिका ]

साशङ्क चित्त बावरें, भरें कांपरें !
क्षितिजावर यायाला कां सङ्कोच वाटतो बरें ? ध्रु०

घननीळ नभ प्राङ्गणीं आत्म–द्युति–बळें,
तेजाळ विलसती तारे, तें तेज गमे आगळें !

लुकलुकति ज्योति त्यामधें
फुलविण्या जीव ना धजे !

खद्योत स्निग्ध ज्योत्स्नेंत, अम्बरीं फिरे !
कस्तुरी सङ्गतीं किंवा, मृत्तिका–खण्ड बावरे !

* * * *

स्वयमेव ' उषा ' मङ्गला अन्तरीं स्फुरे,
क्षितिजाङ्गणिं पद ठेवाया चैतन्य देहिं सञ्चरें !

भ्रम पटल दूर जाहलें, चित्त तोषलें,
पडसाद गोड आशेचे कानांत घुमूं लागले !

प्रज्वलित किरण एकलें
जर भावपूर्ण चमकलें

निमिषार्धिं करिल तें, द्वार स्वर्गिंचें खुलें
विकसतील सुमनें, गाणीं गातील आणि पांखरें ! २

दादर–मुंबई
३० डिसेंबर १९३४

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
क्रमांक नं. ३३१२
ता. ७/१/५३
मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ५३८७

# ऋणानुबन्ध !

कधीं झालि कोठेंतरी क्षणाचीच भेट
चमत्कार केव्हढा हा;— पडे जन्मगांठ ! ध्रु०

अन्तरीचे धागे दोरे
एकत्रीत होती सारे
पूर्वापार दोघांचेही सौहार्द अफाट ! १

रत्नाकर—तळीं मोत्यें
आणि राजहंस कोठें ?
परी अन्योन्य सम्बंध त्रैलोक्यीं विख्यात ! २

शर्वरीश अम्बरांत
फेकीं रश्मि—जाल शान्त
चन्द्रकान्तमणी होई भूतलीं सोत्कण्ठ ! ३

कोयळ ती गाणीं गात
स्थान शोधीते निवान्त,
आम्रमंजरी—सौगन्धें भरें वस्तुजात ! ४

माझें मीच धुण्डाळीन
हाकाटी ही व्यर्थ जाण,
— ऋणानुबन्धन तैसें घडें प्राक्तनांत ! ५

आपुलकी भावनेनें
मृत्तिकेचें होई सोनें !
मर्त्यजगा चढें मोल स्वर्गाचें साक्षात !! ६

मुम्बई—पुणें—प्रवास }
२१ एप्रील १९३५. }

# इन्द्र-धनु.

[ चालः—आनन्दी आनन्द गडे. ]

" ताई, माई, या ग या
आकाशामधिं काय पहा !
वर्तुलाकृती पडलेलें
अर्ध पृथ्वि-पोटीं दडलें !
किती मनोहर आकार
अस्फुट रङ्ग मजेदार !
हें देवाचें—मङ्गलतेचें—निशाण साचें—
वाटतसें मज खरोखरी
या क्षणभर या पहा तरी ! १

समारम्भ देवाघरचा
आज साजरा व्हायाचा !
रङ्गित ही म्हणुनीच नभीं
कमान केली काय उभी ?
कीं स्वर्गाचा-वर जाण्याचा-मार्ग मजेचा—
बान्धियला हा काय कुणी ?
ये ना ताई ! साङ्ग झणीं ! २

हिरवें पिवळें रङ्ग नभीं
रङ्गाची झाली गरदी !
स्व-भू-सङ्गम मङ्गल हा
गगन-मण्डपीं होत अहा !
धरा स्वर्गगळिं घालितसे
लग्नमाळ ही काय असे !

कीं पाचूचें–मणिमोत्यांचें–वा कनकाचें—
कङ्कण सृष्टिसती हातीं—
आणुनि सुर ताई ! देती ! ” ३

*　　*　　*

बाळ–बोल मधु हे श्रवुनी
ताई वदली कौतुकुनी—
“ तुझ्या सारख्या बाळांचें—
हास्य उठे आनन्दाचें—
त्या हास्याचे–तरङ्ग साचे–उठती त्याचें—
प्रतिबिम्बित सुन्दर झालें
चित्र नभान्तरिं तेंच खुलें ! ४

पुणें
१७ ऑगष्ट १९२५ }

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
नं.
ता.

# पापिणी पृथ्वी !

[ जाति—चन्द्रकान्त ]

खरोखरी ही अवनी मजला पापी फार गमे
स्पर्श कराया भीती हिजला स्वर्गींचे आत्मे

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

वीज नभांतुनि येतां मार्गीं होते ती विलिन
परी नको तो स्पर्श धरेचा, तिज वाटे हीन !

आकाशांतुनि खालीं येतां, प्रचंड हैम–शिला
वसुन्धरा–सहवास–विचारें कांपति त्या सकला !

वज्र–देह–काठिण्य लुप्त हो वृत्तच नवलाचें
भयभीता त्या सडे पाडिती मार्गीं अश्रूंचे !

पूर्व जन्मिचें पाप फेडण्या भूवरतीं येती
स्पर्श–दिव्य देतसे तयांना मातींतच मुक्ती !

चकमक झळके प्रतिदिनिं रात्रीं अम्बरांत तारा
पुण्याई सम्पता निखळलो, कांहिं न आधारा !

नको स्पर्श या वसुन्धरेचा उज्ज्वल देहाला,
वातावरणीं विलीन होई, येइ न भूगोला !

कधिं काळीं जर आला खालीं दैवहीन दीन
पृथ्वि-स्पर्श होतांच हाय! तो होई पाषाण!

जेव्हां रडतो मेघ ढळढळां होउनि सङ्कष्टी
भूपृष्ठावरि करी बिचारा सतत अश्रुवृष्टी!

अधम धरा ही सान्त्वनपर नच बोले त्या कांहीं
उलट होउनी हर्ष-निर्भरा हांसतची राही!

जणूं मेदिनी-सङ्ग जाहला दिवसभरी म्हणुन
पश्चिमोदधीमधीं उडी तो घेई बघ अरुण!

वसुधा-स्पर्शा भीति या परी आत्मे स्वर्गांचे
तिजला पापी नाहीं तर मग काय म्हणायाचें!

राजमाची, वसन्तगड
१ नोव्हेंबर १९२३

# सन्धि !

*There is a tide in the affairs of men*
*Which taken at the flood, leads on to fortune.*

—SHAKESPEARE

[ जाति—अवनी ]

' एकदांच आयुष्यीं, भेट व्हावयाची;
घे साधुनि; अन्य पुन्हां कधिं न यावयाची ! ध्रु०

मानव–जीवीत मिळे
आज तुला दैव–बळें;
चुकुनि त्यांत तुझि माझी गांठ पडायाची ! १

येती क्षण, जाती क्षण
झरती तव आयु:कण
पुनरपि गतकाल–तूट मुळिं न भरायाची ! २

हातांतुनि तीर सुटे
वाक्शर मुखिंचा निसटे,
परतुनि नच येति, मदिय तीच गती साची ! ३

मत्सङ्गतिं सुर–विलास
मजविण रौरव–निवास;
दोहोंतिल निवड मात्र, तूंच करायाची ! ४

धीवर गळ फेंकितसे
मत्स्यहि त्याप्रतिं गवसे;
अविलम्बें ओढियला तर शिकार त्याची ! ५

ठावें मज मनुज–तेज
करशिल बन्दिस्त वीज;
–जर गेल्यें !–कालत्रयिं मी न मिळायाची ! ६

देव असो, दैत्य असो,
नर नारी जीव असो,
भेदुनि परि एकवार त्यास जावयाची ! ७

कऱ्हाड,
१० नोव्हेंबर १९३४

# आतांच कां हें असें ?

[ वृत्त—शार्दूलविक्रीडित ]

साध्या बाळपणांत खेळ कितिदां तूं मी बरें खेळलों ?
माझ्यावीण मुळीं तुला करमणें ना एक बाले ! क्षण !
प्रेमोत्कण्ठित साद गोड कितिदां तूं घालिसी आणिक,
नाना प्रश्न विचारुनी मज सदा भण्डावुनी सोडिशीं ! १

बाल्याचा सखल प्रदेश सरुनी तारुण्यसीमेवरी
मुग्धत्वाभरणें खुलावट तुझी आली उताला पुरी;
बाल्यीं बालपणा अजाण विरला; गेलेंच साधेंपण
आतां लागलिं तोरणें फडकण्या येत्या नव्या सृष्टिचीं ! २

सारा नूर तुझा सुधे ! बदलला वाऱ्यासही ना उभी—
माझ्या राहसिं सम्प्रतीं; मग कशाचें नांव नी हांक तीं !
आहे रोष तुझा जरी मजवरी चोरुनिया दर्शन—
कां घेसीं तुमजे; कटाक्ष मधुरे ! कां फेंकिसीं गोडसा ? ३

कां बाले ! धरिसी, मनांत, नकळे, सङ्कोच वृत्ती अशी ?
प्रीतीच्या पडद्यापल्याड घुमतें कीं गूढ सङ्गीत हें !
साधी अन् मनमोकळी तव गडे ! वृत्ती लया जाउनी,
टाकी प्रश्नः–सखोल वर्तन तुझें आतांच कां हें असें ? ४

पुणें,
३ मे १९२५

# झोंपणें साङ्ग गडे ! कुठवरीं....?

[ जातिः—केशवकरणी ]

स्वच्छ चान्दणें पिठासारखें भुरभुरलें भूवरीं
पखरण पारिजात जणुं करी ! ध्रु०
—ही झुळुक वायुची मन्द मृदुल निर्झरी
शरिरास गुद्गुल्या होति कुठुनशा तरी !
रोमांच अचानक उठती देहावरी !
शुभ्र रुपेरी चादर अङ्गावरी पाङ्घरुनि बरी,
झोंपली शान्त शान्त शर्वरी ! १

*   *   *   *

चन्द्रमुखी ! अधिवास जरि तुझा कैक योजनें दुरी
चान्दणें फुललें माझ्या उरीं !
—नव आशालहरी तरळति हृत्सागरीं
सम्भ्रमित वृत्ति लवमात्र होत कां परी ?
बधिरता जडतसे नकळत गात्रान्तरीं !
स्मृति-सुमनांची चादर गुम्फुनि पाङ्घरूनि तनुवरी
झोंपणें साङ्ग गडे ! कुठवरी ? २

दादर, मुंबई
२१ ऑगष्ट १९२४

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत

# रमूं ये प्रेम–संसारीं !

[ गझल ]

करीं निर्धार शेवटचा विचारी वृत्ति तव भारी
कितीदां साङ्गणें तुजला रमूं ये प्रेम–संसारीं ! ध्रु०

मुशाफिर या जगाचा मी क्रमाया जीवपथ आलों
मिळेना सांथिदार कुणी म्हणूनि बावरा झालों !

बघोनी मार्ग अवघड हा गडे ! मम चित्त गडबडतें
परी तव मूर्ति आठवतां मनाला शान्तता येते;

निरुत्साहामुळें जग हें घनांधःकारमय वाटे
तुझ्या चैतन्य–ज्योतीनें तया तेजस्विता येते !

चढाया सौख्य–सोपानीं तुझ्यावरि भिस्त मम सारी
तरी ही याचना तुजला ' रमूं ये प्रेम–संसारीं ! ' १

*  *  *  *

अशा नाजूकशा गोष्टी
नसे हा प्रश्न थट्टेचा

हंशावारी कशा नेसी ?
पडे ही गांठ प्राणाशीं !

पुरे सरफांस प्रेमाचा
सुखाचा शब्द ऐकाया

गळ्याशीं येउनी भिडला
अहाहा ! जीव तान्हेला !

कुठें तुकतांच आतांसा
नको आनन्द तों मानूं

जरा ये डाव रङ्गांत
तिथें बेरङ्ग करण्यांत !

रिघाया पैल तीराला
न साहे धीर घटकेचा

जिवाला ओंढणी लागे
उद्यांचा वायदा नलगे !

सदा हृन्मन्दिरीं माझ्या
कशाला पाहसीं अन्त ?

तुझी मूर्ती मनोहारी
रमूं ये प्रेम–संसारीं ! २

पुणें,
१२ ऑगष्ट १९२६

# जाउं दूर रानीं....!

[ जातिः—मोहिनी ]

दूर दूर जाऊं कोठें शान्त दूर रानीं
आणखी निरन्तर गाऊं गोड गोड गाणीं ! धृ०

बन्ध जिथें नाहीं तिळभर जाण कृत्रिमाचा,
छन्द कुणा नाहीं मुळिं उपहास करायाचा,
गन्ध लेशमात्र न ठावा फन्द फितुरीचा,
मुक्तकण्ठ गाऊं तेथें तूं नि मी मिळोनी ! १

सांथ मञ्जुलालापांनीं विहगगण करील !
ताल बाळ निर्झर झुळझुळ वाहुनी धरील !
पर्णभार आन्दोलनिं तरु सूर काढतील !
विपिन भाग जावो घुमुनी मधुर गायनानीं ! २

गुम्फुनी परस्पर कण्ठीं माळ करसुमांची !
बोलणीं श्रवूं थे सुभगे ! रानपांखरांचीं !
चाखुनी बघूं रुचि मधुनी विविध वनफळांची !
—दृश्य पाहुनीसा हेवा करावा सुरांनीं ! ! ३

दादर, मुंबई
१५ सप्टेंबर १९३४

# भावड्या जिवा—!

[ जातिः—भूपति वैभव ]

भावड्या जिवा! तिळमात्र न तुजला पोंच!
कां उगाच आशा बाळगसी भलतीच?

जें साध्य न त्याचा, साङ्ग कासया ध्यास?
ही आस अचानक गळ्यास लाविल फांस!

निज उरीं भावनोत्कण्ठा। जरि स्फुरे
हुरहुरी हृदन्तरिं वेडी। सखरे

उभाविसी चित्रपट रम्य कल्पना-जाल
—मृगजलाभास हा, खास खुळ्या! फसशील! १

स्वच्छन्द अम्बरान्तरीं पतङ्ग विहारी
परि अमर्याद नच गती, खेचते दोरी!

ग्रह-गोल स्वैर फिरतात अन्तराळांत!
हा भास निखालस, कुणि न बन्धनातीत!

करिं अन्तर्मुख दृष्टी तूं। घडिभरी
जाणीव स्वयंस्थानाची। लव धरीं

आवरीं पङ्ख पांखरा! व्यर्थ जीवास—
मुकशील, प्राणघातकी सोड ही हौस! २

दादर-मुंबई
११ ऑगष्ट १९३४

# निस्तेज चन्द्रास–!

( कधीं कधीं आकाशात दिवसा देखिल चन्द्र दिसतो; परन्तु तो कितीं निस्तेज असतो ! )

[ वृत्तः—दिण्डी ]

चन्द्रराया ! निस्तेज कां असा तूं ?
  काय मनिंचा तव साङ्ग बरें हेतू !
दिससि मित्रा ! भारीच तूं उदास !
  अन्तरीची वद काय तुझ्या आस ? १

नभप्रान्तींचा मार्ग आक्रमून
  जासि सखया रे, फार का दमून ?
स्थान नाहीं विश्रान्ति घ्यावयाला
  तरिच माझा चन्द्रमा म्लान झाला ! २

रात्रिं गगनाङ्गणिं रम्य चान्दण्यांशीं—
  खेळ चन्द्रा ! स्वछन्द खेळलासी !
तुला गेल्या त्या सम्प्रतीं त्यजून
  म्हणुनि सुहृदा ! झालासि काय खिन्न ? ३

रत्न–वलयाङ्कित तुझी रातराणी
  दङ्ग असतां स्वर्गीय–गीत–गानीं,
दुष्ट भानूनें हनन तिचें केलें
  म्हणुनि तुजसी खिन्नत्व काय आलें ? ४

सुप्रभातीं या भव्य अम्बरांत
डौल रविराणा येत दाखवीत !
तुजसि विसरुनि तेजाळ भास्कराला—
विश्व वेडें लागलें गावयाला ! ५

असें जग हें बा ! सर्व चालल्याचें !
खेळ सारे येथले वैभवाचे !
गरल पोटीं, परि ओंठ अमृताचे—
सदा देव्हारे माजतील त्यांचे ! ६

खेद याचा लवमात्र तूं न वाहीं;
धीर धरुनी आपदा सर्व साहीं;
कुदिन सम्पुनि, लौकरी जाण सांचें
तुला वैभव लाभेल पौर्णिमेचें ! ७

दादर, मुंबई
९ ऑगस्ट १९३२

# कालाय तस्मै नमः !

[ श्री शिवछत्रपतींच्या त्रिशत–सांवत्सरिक–उत्सवदिनीं गाइलेलें गीत. ]

[ वृत्तः—शार्दूलविक्रीडित ]

झालीं छत्रपतीस जन्मुनि अजीं वर्षे पुरीं तीनशें
कालाच्यामधिं फेरफार घडुनी हा केवढा येतसे !
तत्कालीन स्थितीस आज तुलतां, सद्यस्थितीशीं जरा
जातें चित्त दुभङ्गुनी, प्रभुवरा ! हा जीव हो घाबरा ! १

त्याकालीं शुभजन्म लाभत महाराष्ट्रांत मातें जरी
माझें भाग्य खरोखरी न तुलतां, येतें कुणाला तरी !
आहे ऐन विशींत आज, असतों तेव्हां असा मी जर
आयुष्यामधिं केवढें दिसुनियां येतें तुम्हां अन्तर ! २

माझा हा उमदा स्वभाव बघुनी, तारुण्य उन्मादक,
वाणी गोड, तशीच वागणुकही भारी मनोवेधक —
पाहोनी शिवभूप छत्रपति तो, होऊनिया हर्षित
‘ किल्लेदार तुम्ही ’ म्हणूनि करिता माझा किती गौरव ! ३

वारू सुन्दर उच्च एक अरबी, मन्दीलही भर्जरी—
देता रत्नविभूषिता तळपती तल्वार माझे करीं !
मन्त्री मानकरी समस्त जनता पाचारुनी लौकरीं
उद्देशूनि मला, सभागृहिं अशी तो काढिता वैखरीः— ४

"आहे थोर जबाबदारि तुमची जाणा अतां नेहमीं;
राज्याचे अमुच्या इथून पुढतीं आधार मोठे तुम्ही!
सेवाधर्म इमान राखुनि करा,–छे, बोललों व्यर्थ हें!
कायस्थास इमान काय असतें साङ्गावया कां हवें?" ५

मीही सादर त्या प्रणाम करुनी उद्गारतों सद्गद
"दावूं आज कशासि बोलुनि नृपा! माझेंच मी हृद्गत!
आहे हें शिर अर्पिलें तव पदीं, तूं प्राण, तूं जीवन!
काया ही कुरवण्डुनी तुजवरी मृत्यूस आलिङ्गिन!" ६

जातांना मुजरा करूनि विनयें, होऊनि अश्वारूढ,
खोवोनी समशेर मी कटिं निघें गांठावयातें गड!
माझी प्राणसखी सुहास्य–वदना पञ्चारती घेउन
दुर्गद्वारिं सहर्ष वाट बघती, सोत्कण्ठ उल्हासुन! ७

—तो हा दुर्ग उभा *वसन्तगड कीं माझ्यापुढें सम्प्रतीं
त्याची आज घडूनि येइ अगदीं केंवीलवाणी स्थिती!
गाणीं गाउनि त्यावरी, रिझवितों मी त्याचिया मानसा
भोळा तो गतवैभवास स्मरुनी टाकी उसासा कसा! ८

वाद्यें नौबदि, भेरि वाजति जिथें सानन्द रात्रन्दिन
तेथें निर्जनता भयाण पसरे, ओसाड माजें वन!
धिग् धिग् जीवन हें गमे तव गडा! त्याचेविणें आगळा
कां नाहीं दडलास भूमितळिं तूं, भूकम्प होता भला! ९

---

* हा किल्ला, कऱ्हाड–सातारा रोडवर, कऱ्हाडच्या अलिकडे ४।५ मैलांवर असून, मोटारींतून जाताना स्पष्ट दिसतो.

—देऊं दूषण मी उगाच अथवा किल्ल्यास माझ्या कसें ?
त्याचा जो धनि, वीरवृत्ति जगतीं शोभून ज्याला दिसे—
शस्त्रास्त्रें विसरूनि, घेउनि करीं तो लेखणी शाइनें—
गाणीं फोल लिहीत, हाय ! क्रमितो लाजीरवाणें जिणें !

—त्यालाही वच वाउगे वदुं कशा ? त्याचा नसे दोष हा;
जो स्थित्यन्तर हें प्रचण्ड घडवी ‘ कालाय तस्मै नमः ;’

राजमाची, वसन्तगड
३ एप्रिल १९२७

# गुलाबी फौज

( अशा फौजा, पुण्य-पत्तनीं पर्वतीच्या आसपास, व मुंबई-मुक्कामीं मलबार हिल् बाजूस, सायंकाळ सुमार, कधीं कधी दृष्टोत्पत्तीस पडतात ! )

[ चाल—नृप ममता… ]

बेदर्द गुलाबी फौज
चालली कुठें ही आज ?—नच कळे !
शृङ्गार-साज हा सारा
हा झपाटाच मज न्यारा !—गमतसे,
तो नूर जरी बेताल
चवचाल-छे, तरी चाल !—मुळिं नसे !
ईश्वरा !—दया करिं जरा-करीं लव त्वरा—
फौज साम्भाळ-नीट साम्भाळ !
*नच जडो दृष्टि चाण्डाळ !—ती वरी १

चान्द्ण्या नभीं मावळल्या
त्या खेळ खेळण्या आल्या !—भूवरीं !
प्रखरता सूर्य किरणांची
सहन त्यांस होणें कुठची ?—अम्बरीं
स्वर्गीय तेज सहवासें
ही सृष्टिसुन्दरी भासे— हांसरी !
ईश्वरा !—दया करिं जरा-करीं लव त्वरा
तारका जाल-नीट साम्भाळ
नच जडो दृष्टि चाण्डाळ !—त्यावरी २

---

* पापीवृत्तीनें पाहणाराची.

मदनेश–सैन्य–आगामी
सूचना काय हर नामा !—नच कळे !
फडकतीं निशाणें साचीं
कीं भिन्न भिन्न रङ्गाचीं !—छानशीं !
मधु–पुष्प–मण्डिता ऐशी
विजय·श्रि–मालिका खाशी !—काय ही ?
ईश्वरा !—दया करिं जरा–करीं लव त्वरा—
रम्य सुममाळ–नीट साम्भाळ
नच जडो दृष्टि चाण्डाळ !—ती वरी ३

तेजाळ विजेचीं बाळें
करितात स्वैर कीं चाळे !—नच कळे !
शकलेंच इन्द्र–धनुचीं कीं,
तडकुनी खालती येतीं !—चमकतीं !
फुल–पांखरेंच स्वच्छन्दीं
फिरतात रङ्गि–बेरङ्गीं !— काय हीं ?
ईश्वरा !—दया करिं जरा–फूलपांखरा—
नीट साम्भाळ–प्रभो प्रतिपाळ !
नच जडो दृष्टि चाण्डाळ !—त्यांवरी ४

अनुष्टुप

"गुलाबी फौज" पाहोनी, 'दत्त' सानन्द हा हंसे;
कल्पना सुमनें साधीं, तीवरी उधळीतसे !

पुणें,
२० डिसेंबर १९२७

राजा ग्रंथ · वाचनालय ठाणे
४३५१

# पड्याआड....!

( चालः—कौरव पाण्डव सङ्गर ताण्डव )

—पड्याआड जगाच्या आहे काय चाललें पाहुं नये !
यांतच सारें सार सुखाचें, अज्ञानासम सौख्य नव्हें !

सुधारसाचा सागर भासे—चन्द्र विहरतो गगनांत
नको चिकित्सा आणि चौकशी—फत्तर येइल हातांत !

सौंदर्याचें निधान केवळ—कमल मोहवीं चित्तास
जन्म कुठें ? अन् कसा ?—कशाला चिखलाचा नसता ध्यास ?

माणिक मोतीं मोहक मोठीं देव-दानवां भूषवितीं
नरनारींना शिरोधार्य तीं, कोठुनि भूवरतीं येतीं ?

इन्द्रधनूची कमान सुन्दर, मेघपङ्क्ति किति छान खुले !
दृग्भासाचा खेळ चालतां भोळें मानस त्यास भुले !

चटक चान्दण्या चम् चम् चमको-शास्त्रज्ञांचे नको धडे
दडुनि कुठेंही बैस कोकिळा ! तान गोडशी घुमव गडे !

दुरुनी डोङ्गर सर्व साजिरे, जवळीं जातां अमित भयें,
'मूळ नदीचें कुळ मुनिचें' कधि पुराण साङ्गें शोधुं नये !

दादर-मुंबई
३१ डिसेंबर १९३५

# हुङलेलें फूल !

[ वृत्त — दिण्डी ]

सहज गेलों उपवनीं फिरायाला
व्यग्र चित्ता लव स्वास्थ्य द्यावयाला !
दूर करण्या संसार यातनांना
विस्मराया उद्विग्न भावनांना ! १

तिथें मोठाले ताटवे फुलांचे
रम्य फुलले मम स्वागतार्थ सांचे;
दृश्य पाहुनि तें नयन मनोहारी
मोद झाला मम मानसास भारी ! २

कुञ्ज कुन्दाचा फुलुनि पुरा गेला
भार झाला जुइ–लता–मण्डपाला,
आणि बकुळीला बहर कसा आला,
काय रसिका ! मी साङ्गुं हो तुम्हांला ! ३

सुभग सौगन्धिक मन्द मन्द वात
तप्त हृदयां सानन्द करी शान्त !
विरुनि गेलें काहूर विचारांचें
सहजिं पसरें साम्राज्य शान्ततेचें ! ४

सुमन–सम्भारें नटुनि बागशाही
ईशकृतिची देतेच काय ग्वाही !
क्षणिक झाला भ्रम असा मन्मनास
करित कौतुक मी आक्रमी पथास, ५

गर्द हिरवी सुमलता एक छान
पुढें जातां वाटेंत ये दिसून;
प्रसुन एकच उत्फुल्ल जाहलेलें
लतावलयीं स्वच्छन्द खेळ खेळे ! ६

पुष्प हंसरें तें रुचिर गेन्ददार
बघुनि झाला आनन्द मना फार !
'खुडुनि घेऊं या त्यास हुङ्ण्यास'
हीच चित्तीं, वावरे गोड आस ! ७

हृदय वेडें हळुवार कुठुनि त्याला
पुष्प खुडण्याचा धीर व्हावयाला ?
हात पुढतीं लव जाइ ना मुळींच,
'पुष्प छेदन !'—छे, कल्पनाच नीच ! ८

आणि म्हणुनी नच दुखवितां फुलाला
हळुंच वेलीवर हुङ्गिलें तयाला !
गन्ध सेवुनि सन्तोष मना झाला
धन्य माझ्या मानिलें जीविताला ! ९

सुमन-दर्शन घेऊनि एक वार
मार्ग क्रमण्या मी होतसें तयार;
—तोंच मोठें आश्चर्य ये घडोनी
शुभ्र कुसुमांतुनि ईषदेक वाणी— १०

"हाय ! केलें हें काय निर्दया रे !
देह माझा भ्रष्टिला तूं कसा रे !
नीच अगदीं ही जात मानवाची,
चाड कुठुनी त्या सुमन-शुद्धतेची ? ११

—आणि करुनी पावित्र्य—भङ्ग आतां
त्यजुनि जाणें मज, शोभतें तुला कां?
देह माझा त्वत्पदीं जाण लीन
कोण त्राता मज अन्य तुझ्यावीण?" १२

बोल वदुनी हें थकुनि फूल गेलें
दीनवाणें बापुडें स्तब्ध ठेलें!
पुढतिं कम्पित कर करुनि मी तयास
जपुनि लागे खुडण्यास सावकाश! १३

अहा! जलबिन्दू दोन तों गळाले!
आणि माझ्या नयनांत अश्रु आले!
मधुर सुम तें चुम्बुनी गौरवीलें
हृदय भागीं मृदु—करें ठेवियेलें! १४

* * * *

—नाहिं पुनरपि तें हांसलें कधींच
छे! न फुललें यापुढें तें मुळींच!
जतन केलें जरि जिवापाड त्यास
पुष्प कायिमचें राहिलें उदास!! १५

राजमाची, वसन्तगड
१२ जानेवारी १९२७

# नवें बाळ !

( एक लहान बालिका, घरांत नवीन भावण्ड खेळावयास लाभल्याचें गोड वृत्त, आपल्या मैत्रिणीस साङ्गत आहे. )

[ जातिः—मुद्रिका ]

" किति नवल साङ्गुं ग तुला सखे ! वर्तलें
नव बाळ छान आईला आमुच्या आज जाहलें ! ध्रु०

छबकडें, करुनिया गडे, नयन किलकिले
जणुं भीत भीत न्याहाळी आम्हांला तें सोनुलें !

इवलिशी रम्य नासिका, अधर चिमुकले
लुसलुशित कोमल गालीं डंवरलीं गुलाबीं फुलें !

मुखमण्डल सुन्दर खुलें लाल गोजिरें
मुठि घट्ट आवळुनि वेडें करि निश्चय कसला बरें !

हालवी पाय दुडदुडां चपळ चिटुकलें
एव्हांच दाण्डगाई ही, मग होइल कैसें पुढें !

सवड ना अतां व्हायची रोज तुजसवें—
खेळण्यास मातें, कां तें तुज साङ्गाया का हवें ?

— अगबाइ ! काय ऐकुं ये बाळ मम रडे !
तव निरोप घेत्यें आतां नच राग मान तूं गडे ! "

दादर, मुंबई
३ डिसेंबर १९३२

# विश्वांतील विषमता !

[ वृत्त—शार्दूलविक्रीडित ]

चन्द्राची मधुर प्रभा विलसतां, उल्हासते मेदिनी
त्याचें शीतल रश्मिजाल बघुनी, वाटे शशी हा गुणी;
मोठें नांव 'सुधांशु' यास असुं द्या, आहे कलङ्कांकित
येतां वय, झिजूनि हाय! विधु हा होणार मृत्युङ्गत !

लाटा आपटुनी, निनाद करुनी, गर्जू नको सागरा !
सारा हा बडिवार पोकळ तुझा, ठावें अम्हांला पुरा !
कोण्या दुर्बल नाविकास छळुनी, मानीं मनीं धन्यता;
सीमा आंखिव लेशमात्र न तुला येणार उल्लङ्घिता !

भारी मोहक ही गुलाब कलिका—काटे तिच्या भोंवतीं,
सौगन्धान्वित चन्दनासि जहरी हे सर्प आलिङ्गती !
डौलानें डुलते जरी कमलिनी, ती कर्दमीं जन्मली !
भोळा सन्तत दीप तेवत परी अन्धार त्याचे तळीं !

विश्वांतील विचित्र ही विषमता काढी गमे हा ध्वनीः—
'वैगुण्यासि बघूनिया कधिं नका हांसूं कुणाला कुणी !'

दादर, मुम्बई
२ ऑगष्ट १९३१

# मैनेस—

( चाल—श्रीमन्त पतीची राणी— )

गा गोड गोडशीं गाणीं—मैने, तूं मञ्जुळवाणी ! ध्रु०

सारङ्गि वीन अलगूज
मज नको मानवी चोज
ऐकवीं तुझी मधु वाणी—गा ! गोड गोडशीं गाणीं !

बोबडे बोल मृदु बोल
वाटती तेच बिनमोल !
शिकविले तुला ग कोणी ?—गा ! गोड गोडशीं गाणीं !

वद ' विठ्ठल विठ्ठल ' पाहूं
' विठ्ठलां ' त रङ्गुनि जाऊं !
प्रभुनाम घुमूं दे गानीं—गा ! गोड गोडशीं गाणीं !

घे लकेर सुन्दर एक
देईन खाउ मग देख !
गुणि माझी मैनाराणी—गा ! गोड गोडशीं गाणीं !

किति हट्ट धरावा बाई !
—छे, इतुकें शोभत नाहीं !
भारीच गडे तूं मानी—गा ! गोड गोडशीं गाणीं !

दादर, मुंबई
डिसेम्बर १९२९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
स्थळ प्रत
क्र.
वि.
ता.

# सवाल

[ वृत्त—दिण्डी ]

चैत्र मासांतिल, सुखद वसन्ताचे
दिवस होते ते हळदिकुङ्कवाचे;
—घरोघरिं जाउनि वसुल करायाचे—
काजु, बत्तासे, पले हरभऱ्याचे ! १

सान सुशिला ( गतधवा माउलीची )
हौस तिजला बहु हळदिकुङ्कवाची !
म्हणुनि मातेनें तिला न्यावयातें
तिच्या वाड्यांतिल साङ्गणें स्त्रियांतें; २

असे गेले दिन चार ते मजेचे;
एक शङ्का परि बालिकेस डांचे !
'जात ललनागण हळदिकुङ्कवाला
कां न जाई मम माय कधीं काळीं ?' ३

—धीर करुनी एकान्त साधुनीया
भज्ञ बाला ती लागली पुसाया
तिच्या जननीला—"कां ग जावयाला—
तुला फावे नच हळदिकुङ्कवाला ? ४

पहा शेजारिणि आपुल्या कशा या
   नटुनि थटुनी निघतात नित्य जाया!
तूंच आई! परि एकली बसून,
   काय करिसी गृहिं, मला तें कळें न!" ५

*　　*　　*

मुग्ध बालेची मूढ प्रश्नमाला
   तिच्या गेली फाडीत हृत्पटाला!
आणि ओघळली नयनिं अश्रुमाला;
   काय रसिका! देशील उत्तराला? ६

पुणें,
१९२६

मराठी ग्रंथ संग्रहालय

# नर-पिशाच्च !

काळी काळी गभीर राती
मधीच चमके वीज नभांतुनि;
मुसळधार सरि वर्षति तरि ना मन हें डगमगतें ! १

गडगडाट मेघांचा चाले
ईषदेक भू-मण्डळ हाले !
ज्वालामुखि भडकला भयंकर तरि ना मन डरतें ! २

तुफान सागर उफाळलेला
देह त्यांत हा अवचित पडला !
पैलतीर तरि गांठायातें आशा लुकलुकते ! ३

विधवेनें निज मूल त्यागिलें
फूल उमलतें कीं कुस्करलें !
भेदक भेसुर दृश्य पाहुनी हृदय न हादरतें ! ४

खड्ग घेउनी कराल कोणी
आव्हान दिलें युद्धा लागुनि
छातिठोक सामना द्यावया प्रस्फुरतीं गात्रें ! ५

मरणाची मुळिं दिक्कत नाहीं
सुखदुःखाची क्षिति ना कांहीं,
जयापजय दोन्हीहि सारखे चित्त न बावरतें ! ६

तोण्डावरती हास्य विमोहक
हृदन्तरीं हालाहल दाहक !
नर-पिशाच्च परि पाहुनि असलें अन्तर धडधडतें ! ७

दादर, मुम्बई
५ मार्च १९२५

---

# दीप-जीवित

( उपजाति )

दीपा ! तुझें जीवित धन्य धन्य !
मन्मानसीं त्या विषयीं अनन्य—
जो नान्दतो आदर त्यामुळें तें—
मित्रा ! मला फारच प्यार वाटे ! १

वृत्ती तुझी थोर परोपकारी
जात्याच भारी दिसशी विचारी ;
वाचाळता ठाउक लेश नाहीं
कर्तव्य-निष्ठा अतुळा गमे ही ! २

( वसन्ततिलका )

देशी प्रकाश तव तूं इतरेजनांना
अन्धार खालतिं तुझ्या नित खेळतांना !
घेऊनि त्रास, सुखवीसिं सदा परांना
सीमा मुळीं नुरतसे तव सद्गुणांना ! ३

तिग्मान्धकारिं बुडुनी जग जाइं जेव्हां
साहाय्य त्यास करण्यास्तव येसिं तेव्हां !
" आपत्तिग्रस्त सुहृदां करणें सहाय्य "
दीपा ! न हा गुण वरें तव सान होय ! ४

आहे जगानुभव बा ! तुजलागिं जैसा
अन्या न खास दिसुनी जगिं येत तैसा !
राहील विश्वि अडुनी व्यवहार सारा—
तूझेविना तव असा महिमा उदारा ! ५

विद्वान पण्डित तसे कवि थोर थोर
   जेव्हां निशा पसरते तम फार घोर
आलेखती स्वकिय लेख नि रम्य काव्यें
   दीपा ! तुझ्यासमिप त्वद्गुण काय गावे ! ६

प्रेमोदधींत रमती नर आणि नारी
   आलाप प्रेममय काढिति सौख्यकारी;
आलिङ्गती, सतत चुम्बिति एकमेकां
   क्रीडा अशा सुखद ते करिती अनेका ! ७

जें वाटतें मनिं रहस्य कथावया तें—
   भीती न; ठाउक तया नच कोणि तेथें !
दीपा ! परी बघसि तूं बहु कौतुकाच्या—
   लीला, तसेंच श्रविसी वचना तयांच्या ! ८

अङ्गीं तुझ्या वसतसे गुण उच्च एक,
   त्यानेंच सन्निध तुझ्या गुजगोष्टि लोक—
रात्रीस निर्भयपणें करिती अनेक,
   नाहीं चहाड चुगली तुजपाशिं देख ! ९

ख्याली खुशालित तुझे दिन सर्व जाती
   चिन्ता न ठाउक तुला असते कशी ती !
जीवीत हें सुखदसें असलें बराया,
   आशा न मी करुं कशी वद दीपराया ! १०

राजमाची, वसन्तगड
१९ डिसेंबर १९२३

# निद्रेस—!

[ आंग्ल कवि वर्ड्स्वर्थ याच्या To Sleep या कवितेची
ही दुसरी बाजू होय ]

[ वृत्तः—शार्दूलविक्रीडित ]

आकाशीं रविराज हांसत मुदें फेंकी प्रभा आपुली
सारी ही खग–मण्डळी मधुरशीं गाणीं म्हणूं लागलीं !
वातान्दोलित रम्य वृक्षगणही नाचूं डुलूं लागला
निद्रे ! सोड; न्यहाळूं दे मजप्रतीं हा सृष्टिचा सोहळा ! १

नाना ग्रन्थ सभोंवतीं पहुडले, त्यांच्यासवें सन्तत—
बोलाव्या गुजगोष्टि चित्त म्हणुनी होतें समुत्कण्ठित !
निद्रे ! तूं करपाश मोहक तदा माझ्या गळा घालिसी,
मित्रापासुनि खेंचुनी मज सदा नादीं तुझ्या लाविसी ! २

चिन्ताग्रस्त कितीक जीव असती या भव्य विश्वान्तरीं
दुर्दैवी तुजवीण कण्ठिति जिणें जीवन्मृताचेपरी !
—जा; जाऊनि तयांस भेटुनि करीं त्यांचें सुखी जीवन;
निद्रे ! लाभ कळे न काय तुजसी माझ्यासवें राहुन ! ३

आहे प्रेम खरोखरी मजवरी भारी तुझें सुन्दरी !
गाणीं गाउनि गोड पूजिन तुला माझें मनोमन्दिरीं;
नित्याचा व्यवसाय सम्प्रतिं परी सारा अडोनी पडे,
निद्रे ! सोड सखे ! नको मुळिं नको तूं राग मानूं गडे ! ४

दादर, मुंबई
२८ डिसेंबर १९३१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
स्थल प्रत
क्र.
ता.

# कोम्बडा !

[ वृत्त – दिण्डी ]

कुणा आवडतो मोर पिसाऱ्याचा
अले कोणाला छन्द कोकिळेचा;
कुणी असतो नादिष्ट पोपटाचा
मला आहे परि नाद कोम्बड्याचा ! १

करायाचें मज काय पिसाऱ्याचें ?
मधुर–कण्ठा–पक्षिणी कोकिळेचें ?
खाद्य खाया देतांच बोलतो जो
असा नटवा शुक तुम्हां आवडो तो ! २

किती माझा कोम्बडा ऐटदार,
चाल त्याची किति बरें डौलदार !
शिरोभागीं छानसा तुरा हाले
जणूं जास्वन्दी फूल उमललेलें ! ३

पिसारा त्याचा किती झोंकदार
चोंच त्याची चिमुकली बांकदार !
अर्धपायीं पाण्ढरीशी विजार
गमे विहगांतिल बडा फौजदार ! ४

“ उठा मुर्खांनो ! झोंप काय घेतां ?
    अरुण उदयाचा काल असे आतां !
करा कांहींतरि आळसा त्यजून ”
    उषःकालीं सांङ्गतो ओरडून !  ५

किती माझा कोम्बडा हो शहाणा
    लोक—कल्याणा झटतसे पहा ना !
बरें वाइट त्या म्हणा कुणी कांहीं
    मास कर्तव्या सोडणार नाहीं !  ६

लोककल्याणीं दक्ष असा प्राणी
    जगीं मजला या दिसत नसे कोणी !
मोर, पोपट, कोकिळा, राजहंस
    रिकामा यांचा बडेजाव खास !  ७

अती परिचय जाहला कोम्बड्याचा
    म्हणुनि करितां कां मानभङ्ग त्याचा ?
जरी आवडला नाहिं तो तुम्हांला
    सदा देई आनन्द मन्मनाला !  ८

राजमाची, वसन्तगड
५ नोव्हेंबर १९२३

# छोट्या बहिणीस—

[ जाति —मोहिनी ]

राग कां ग आला माझ्या आज सोनुलीला ?
दुखविलें कुणी या माझ्या लाडक्या फुलाला ? ध्रु०

नेत्रयुग्मिं ओघळली ही रम्य अश्रुमाळ
आणि चिम्ब झाले चिमणे गाल लाल लाल !
रक्तवर्ण मुखमण्डल किति शोभलें विलोल !
गोड चारुता ही सहली नाहिं कां कुणाला ? १

हास्यचन्द्र मेघान्तरिं तव कोठल्या दडाला ?
कुणि ग स्तब्ध केलें माझ्या गान-कोकिळेला ?
कुठें लुप्त झाल्या न कळे रुचिर बाल-लीला !
दृष्ट कुण्या चाण्डाळाची लागली मुलीला ? २

राहिं तूं उगी ग माझी तान्हुली गुणाची !
सांगूं काय चिऊताऊची गोष्ट तुज मजेची ?
आणु कां गडे ! तुज 'गो गो' शपथ या गळ्याची !
बोल पाहुं छकुले, जाऊं भूर फिरायाला ! ३

दादर, मुंबई
मार्च १९३२

# अव्यक्त प्रेम !

तीः—( स्वगत )

" रोज रोज तूं सखया ! जाशी माझ्या दारावरून्
—जातां दारावरून् पाहतें तुजसी मी न्याहळून !

ओळख पाळख तिळभर नसतां, अवचित ओठामधून्
' सखया ! ' उठते साद निखालस ऋणानुबन्धन् म्हणून् !

सायन्तनिंचीं उन्हें सुवर्णाङ्कित फिरतीं भूवरून्
मन्द समीरण झुळझुळ वाही, जग जाई मोहरून् !

समय तुझा नेमका, जाशि त्या वेळीं दारावरून्
ओझरती मधु नजर फेंकुनी, टाकिसि मन बावरून् !

मन्त्रमुग्ध मी कामधाम सोडुनी गवाक्षामधून्
जीवभाव नयनांत आणुनी, बसतें धरणें धरून् ! " १

*　　*　　*

तोः—( स्वगत )

" रोज रोज मी सखये ! जातों तुझिया दारावरून्
भास अन्तरीं एक — पहावें तुजला डोळे भरून् !

अनदृष्टीला दिसल वाटगों, मन वेतों आवरून्
नजर खेंचतों अन्य दिशेला, जिव जातो गोन्धळून् !

घरन्दाज कुलशीलवन्त तू, लौकिक तव आठवून्
भीषण भवितव्यता–चित्रपट टाकी मज भेडवून् !

कशास टाकूं प्रश्न आणखी हांसें घेऊं करून्
हात दावुनी अवलक्षण हें पाहुंच कां पारखून् ?

जिथें न जावें तेथें गेलें चित्त खुळें हें जडून्
मन समाधानार्थ प्रत्यहीं दर्शन घेतों दुरून् ! ” २

*　　　　*　　　　*

कालौघावरि अशींच कांहीं वरुपें गेलीं सरून्
आणि तियेचा कुणाशीं तरी लग्नयोग ये घडून् !

होता धनवान् होता गुणवान् सर्व कांहिं ये जुळून्
जिवाशिवाची मिळणि न होतां, उणिव कशी ये भरून् ?

संवत्सर नच पूर्ण लोटलें, — व्हायाचें ये घडून्
भेसुर क्षयभावना तियेची तनु टाकी पोखरून् !

प्रपञ्च-लतिकेवरचें सुम तें गळलें, गेलें सुकून्
( तिच्या जिवाचा जिवलग तिजला मिळेल कां हो फिरून् ? )

‘ देशासाठीं फकीर झाला ’ वदती कोणी कुठून्
‘ क्रान्ति-कटांतिल फरारी ’ अशी कीर्त जाय गाजवून् !

दोन जिवाच्या दोन परी या आल्या अघटित घडून्
दोष कुणाचा ? कुणास ठावें ! कर येइ भडभडून् ! ! ३

दादर, मुम्बई
४ मे १९२४

# औरङ्गजेब आणि शिवाजी

[ वृत्तः—शार्दूलविक्रीडित ]

बन्धूंच्या रुधिरें कलङ्कित करें बन्दिस्त केला पिता
तख्ताधीन न होशि तोंच रिपुची त्रेधा न ये बोलतां !
नम्रत्वें रजपूत शीख नृपती झाले तुझ्या अङ्कित
सारा उत्तर जिङ्कुनी क्रमियला तूं दक्षिणेचा पथ !

पादाक्रान्त निजाम-बेदर-अदिलशाही करोनी रणीं
सामर्थ्ये निज नामशेष अगदीं केला मराठाग्रणी !
अङ्गीं बाणुनि धर्मवेड छळिली तूं अन्यधर्मी प्रजा
कीर्ती-दुन्दुभि हा असा दुमदुमे औरङ्गजेबा ! तुझा !

स्वातन्त्र्योर्मि हृदन्तरीं उभवुनी, त्या मावळ्यांच्या बळें
केलें राष्ट्र स्वतन्त्र तूं शिवनृपा ! दास्यांतुनी आपुलें;
धन्या धर्मसहिष्णुता तव प्रजा तूं पुत्रवत् पाळिली
' शम्भूचा अवतार सार्थ शिवबा ' कीर्ती जगीं गाजली !

—एकाच्या पुतळ्यास आज नमितो सम्राट पुत्र[2] स्वयें
अन्याच्या कबरीस ढुङ्कुनि कुणी पाही न प्रेमादरें !

दादर, मुम्बई
२३ मार्च १९३२

---

१ छत्रपति सम्भाजी २ प्रिन्स ऑफ वेल्स

# भावना आणि व्यवहार !

[ वृत्तः—दिण्डी ]

( १ )

बघुनि छापिल मम काव्य मासिकांत
बाळ छोटा उत्फुल्ल मनीं होत !
अर्थ कळला लवमात्र जरी नाहीं
तरी आनन्दित पोर खुळा होई !

( २ )

अङ्क घेई तो वाचण्यास ताई
कवन वाचुनि आनन्द तिला होई;
" किती भाऊ ! नव छान कल्पना ही
शब्द रचना तर मधुर फार बाई ! "

( ३ )

हातिं पडतां तो अङ्क मासिकाचा
हर्ष होई दादास कमालीचा !
' फुकट लाभतसे अङ्क वाचण्यास '
हाच मोठा सन्तोष त्या जिवास !

( ४ )

— आणि पाहुनि तें गोड गीत माझें
चित्त प्रमुदित जाहलें माउलीचें ।
वदे " बाळा रे, छन्द तुझे नाना,
शरिर–स्वास्थ्याची काळजी मुळीं ना ! "

( ५ )

वृत्त कळतां वडिलास बोलती ते—
" ढेंकणागत कवि जाहलेत बेटे !
नको धन्दा तिळमात्र, रिकामे हे—
करिति चाळे, आमुचें पाप आहे ! ! "

दादर, मुम्बई }
१४ जून १९३४ }

[library stamp with handwritten numbers]

# निद्रिस्त बाळास—

[ चाल.—वन्दन तुज मातृभूमि— ]

ऊठ सख्या ! ऊठ अतां उदित हो उषा
ऊठ गडे, झोंप पुरे, ऊठ राजसा !      ध्रु०

चिन्मङ्गल मङ्गलमय विश्व हांसलें
स्वागत करण्यार्थ तुझें सज्ज जाहलें !

विहगवृन्द मञ्जुळ मधु काढि वैखरी
निर्झर खळखळत गुणी ताल हा धरी !

भृङ्ग-तती गुञ्जारव गोड चालवी !
शीतल मृदु मन्द पवन सांथ त्या करी !

तिमिरयुता सङ्कटमय सम्पली निशा
ऊठ गडे ! झोंप पुरे, ऊठ राजसा !      १

*      *      *

गाइ गुरें कुरणांतुनि हिण्डुं लागलीं
शेतसरी बघ सगळी शोभली भली !

सुन्दर तरुवेलीवरि बहरलीं फुलें
परिमळ दरवळत मधुर दशदिशीं खुले !

फेंकित त्वन्नेत्र–किरण–जाल सुखभरें
कोमल हृत्कमल मदिय विकसवीं त्वरें !
सुटत न निद्रा–सखिचा मोह तुज कसा ?
ऊठ गडे ! झोंप पुरे, ऊठ राजसा ! २

* * * *

निर्मळ सुम–सोज्वळ तव रूप साजिरें
रोमाञ्चित तनु करिं मम हर्षनिर्भरें !
मोहक, अति मोहक तव लाडक्या ! हंसें
हांस बघूं, फिरुनि मला पाहुं दे कसें ?
स्थिरचर जगिं अखिल मुदें डोलुं लागलें
बाळ गुणी, कां न कळे, अजुनि झोंपलें !
उघडिं उघडिं नयन–युगुल सुभग पाडसा !
ऊठ गडे, झोंप पुरे, ऊठ राजसा ! ३

राजमाची, वसन्तगड }
मे १९२८ }

# सुगृहिणी !

[ जाति[1] — शूर्पणखा ]

" गेलें तुझ्याविण अडून् — रामा[2] ! काम गेलें तुझ्याविण अडून् । ध्रु०

किती वाट तुझी मी पाहूं ?
शिव्या किती तुला मी देऊं ?
घेसि सदा न् कदा कां छळून् — रामा ! काम गेलें तुझ्याविण अडून् १

भाण्डि-कुण्डी हीं पडलीं तशीं
नच चहासही कप-बशी !
धुणिं जातीं सारीं कुजून् — रामा ! काम गेलें तुझ्याविण अडून् २

घरिं-दारीं केर सांचला,
रामा ! कुठें रे तूं झिङ्गाला ?
जाइ कम्बर माझी खचून् — रामा ! काम गेलें तुझ्याविण अडून् ३

— आतां येतील मण्डइतुनी
भेण्डि, आलू भाजी घेउनी;
अन् तुझा न पत्ता अजून् । रामा ! काम गेलें तुझ्याविण अडून् ४

---

१ नांव ' सुगृहिणी ' परन्तु जाति ' शूर्पणखा ' — हा विरोधाभासालङ्कार आहे !

२ मुम्बईस घरकाम करणाऱ्या गड्यास ' रामा ' असें सम्बोधिलें जातें.

३ ' रामा ' लोकांना ' काहींतरी ' घेऊन कुठं तरी ' झिंगायची ' नेहमींच सवय असते !

'हपिसाची' वेळ होइल
तरि थण्डच माझी चुल !
मग जातिल 'ते' कडकडून्——रामा! काम गेलें तुझ्याविण अडून्"५

❀ ❀ ❀

मति बाईचि विस्मित झाली
तोंच 'स्वारी' घरीं पातली !
परतवीलि गालोगालीं हांसून्–उपाशी[२] तशीच गेली रुसून् ! ६

दादर, मुम्बई
२९ जून १९३२

---

१ खुद्द 'तिकडची' स्वारी.

२ मुम्बईतील हजारो कारकून अशा रीतीनें उपाशी पोटीं 'हपीस' काम उपशीत असतात !

# नाम-लेखन

[ जाति —केशवकरणी ]

सागर-तीरीं सहल करावी, लहर लागली तुला
फिराया आलों चौपाटिला ! ध्रु०

इकडुनि तिकडुनि स्वैर हिण्डुनी बसलों रेतीवरी
घ्यावया विश्रान्ती घडिभरी !

खेळत खेळत वाळवण्टिवरि सहजचि तूं प्रेमलें !
नाम मम सुन्दर आलेखिलें !

'— वा ! खचित आपुलें अक्षर मोत्यापरी !
जनपदीं तुडविलें जाइल परि लौकरी !
कीं वाहुनि जाइल चिमण्या लाटेवरी !'

अप्रिय हें कटु सत्य ऐकुनी कण्ठ तुझा दाटला
अश्रु-सुम-हार तुवा गुम्फिला ! १

*        *        *        *

" खुळी आमुची राणी अगदीं, न कळे थट्टा हिला
अश्रूंचा पूर वृथा वाहिला !
जड जगताची हवी कशाला पर्वा तुज साजणी !
जनांची कदर न ठेवीं मनीं !
हृत्सागरिंच्या तुफान लाटेवरी तुवा मज्जले !
नाम मम अभङ्ग आलेखिलें !

—प्रत्यक्ष विधाता भूवरिं जरि पातला
तरि नाम न आतां पुसतां ये त्याजला !
भिन्नत्व–भाव दोघांत पूर्ण लोपला ! "

प्रियतम मधु हे बोल ऐकुनी जीव तुझा तोषला
अश्रु–सुम–हार तुवा गुम्फिला ! २

दादर, मुम्बई }
११ नोव्हेंबर १९३१ }

# प्रेमले — !

[ जातिः—मुद्रिका ]

जाहलें काय प्रेमले ! हास्य लोपलें !
कां कण्ठ दाटुनी आला, नयनांत साठलीं जळें ! ध्रु०

बोललें कुणी कां उणें अभावितपणें ?
तरिच या अश्रुबिन्दूंचें चाललें रम्य शिम्पणें !

शिम्पले दोन बिनमोल गोड शोभले !
ओंघळूनि माणिक–मोतीं सितवर्ण दिसूं लागले !

मधुगन्ध जणूं दरवळे गुलाबी मळे !
त्या कपोल–युगुल–प्रान्तीं, कारुण्यमेघ ओंपले !

स्वच्छन्द भालमञ्चकीं स्वैर विहरले—
ते केश खेळकर कांहीं, स्थिर एकाकीं जाहले !

मुख–कमल रक्त–धवल जें नित्य विकसलें
कोणत्या कुटिल अनिलानें फुल कोमल कोमेजलें !

—चल सोड उदासीनता, पुष्प उमलुं दे !
कर–पाश–किरण मम आले, हांस तूं हांस मञ्जुले !

दादर, मुम्बई }
१७ मार्च १९३४ }

# विमान

[ वृत्तः—दिण्डी ]

'अहा ! आकाशीं काय उडत आहे !
काय गम्भिर गगनांत गर्जताहे ?
युद्ध व्हायाचें देवदानवांचें
म्हणुनि उठती पडसाद दुन्दुभीचे ! १

पारतन्त्रीं जखडली हिन्दभूमी
तरी निद्रावश घोरतोंच आम्ही !
कींव येवोनी आमुची मनांत
खचित ओरडतो काय देवदूत ? २

महाराज्ञी वा आज विहङ्गांची
स्वप्रजेची पाहणी करायाची—
लहर लागोनी, नभोमण्डळांत
दिसत आहे सञ्चार ही करीत ! ३

खगोलांतुनि कीं तारका तुटून
येइ वातावरणांतुनी घुमून !
वितथ अथवा हें सर्व एक सत्य—
देत आरोळ्या येत कुणी दैत्य !' ४

मनःसरसीं हे कल्पना-तरङ्ग
उचम्बळुनी रङ्गलें अन्तरङ्ग !
तोंच गुणगुणलें कोणसें कुठून
" फिरें वेड्या नभिं जाण हें विमान !! " ५

पुणें,
१४ डिसेंबर १९२५

# चित्तचोरटी !

[ फारा दिवसांनीं 'तो' 'तिला' भेटावयास आलेला असतो ! त्यावेळीं:— ]

[ चाल—' निपुत्रिका ' कवितेची ]

ती:—

" अहा ! हें काय नवल वर्तलें ! अहा ! हें काय नवल वर्तलें !
— पूर्व दिशाङ्कित सूर्यबिम्ब आजि अपरेला उगवलें ! ध्रु०

कशी वाह ! आठवण झाली तरी,
चुकुनि वाट कीं अभावितपणें आला गरिबाघरीं ! "

तो:—

" अहो ! पण वाक्पाटव थाम्बवा !
खाविन्दाच्या पदारविन्दीं अर्ज एक नोन्दवा !

ओढवे आफत आमुच्यावरी,
— हाय ! अमोलिक हृन्मणि नेला चोरुनि कोणीतरी !

हिण्डलों भिरिभिरि देशान्तरीं ....
परि गवसेना चोर; भुतागत देह फिरे भूवरीं !

दया मग येउनि मुनिवर कुणी,
वितरुनि अंतर्दृष्टिदान मज, जाई निघुनी क्षणीं !

ग्रं. क्र. ५३५१

गोष्ट किति नवलाची सुन्दरी !
हृन्मणि माझा अन्य न कोठें; — आढळला तव उरीं !

करुनिया चोरी आणखी वरी,
शिरजोरी मिरवावी नीती थोरा घरिंची खरी ! ”

❀ ❀ ❀

श्रवुनि वच मनराणी हांसली ! श्रवुनि वच सम्राज्ञी तोषली
—‘ अर्ज मान्य ! ’ ही नोन्द गुलाबी गालावरिं उमटली !!

दादर, मुंबई }
२ आक्टोबर १९३४ }

# मोर–पिसारा !

[ चालः–उडुनि जा स्वैर— ]

मोर पिसारा — लखलाभ तुझा तुज मोरा ! धृ०

नाच घालतां उघडा केला
एकवार तो मज दाखविला
सीमा नुरली उपकाराला
धन्य तूं मोरा ! — धन्य मी तुला बघणारा !! १

आकाशींचे तारे जमले
नाच पाहतां मोहुनि गेले !
पाठीशीं तव बिलगुनि बसले !
थाट हा सारा — स्वर्गीय सौख्य देणारा ! २

शाप दिला इन्द्रास मुनींनीं
सहस्राक्ष तो होत तयानीं
तसाच तुजला दिधला कोणी
शाप कीं काय — म्हणुनिया स्थिती ही होय ! ३

शाप दिला उपकारचि झाला
शोभा आली तव शरिराला
'इष्टापत्ती' म्हणती ह्या जला
दिव्य पसारा — थाटला तियेनें सारा ! ४

सरस्वती तव वसते पाठीं
तेतिस कोटी देवा हातीं
पारितोषकें देण्यासाठीं
जमविलीं काय — हीं तिनें पिसें रमणीय ! ५

नाच चालतांना तव भवंतीं
मयुरीगण रङ्गण धरिताती
प्रेमाश्रूसिञ्चन त्या करिती
खचित सुरेख — अश्रुपुञ्ज तो हा देख ! ६

— छे, परि पाहुनि तो मिटतांना
साऱ्या ठरल्या फोल कल्पना
अञ्जन मिळलें मम अभिमाना
निखालस एक — जाहली ठाम समजूत ! ७

क्षणभङ्गुर तव जसा पिसारा
तसाच मम संसार पसारा
व्यर्थ वाजवूं गर्व–नगारा —
कासया साङ्ग ? — पाहतां तुझें हें व्यङ्ग ! ८

राजमाची, वसन्तगड
६ नोव्हेंबर १९२४

# दसरा

[ जाति — चन्द्रकला ]

'दसरा सण मोठा
नाहीं आनन्दा तोटा !'

बाळपणीं दोन वाचिल्या ओळी या छान !

अर्थ मना पटला तसा आनन्द मना झाला !
सण दसरा मोठा हृदन्तरिं कायमचा ठसला !

स्नान पहांटेस दुपारीं भोजन सुग्रास
सायन्तनिं मोदें निघें मी सोनें लुटण्यास !

पानें आपट्याचीं खुडोनी येतां परतून
ओंवाळी ताई स्मितमुखी द्वारीं येऊन !

ताम्हणांत प्रेमें टाकितां पान आपट्याचें
भोळ्या ताईला वाटती होन सुवर्णाचे !

कानवला, खीर तियेनें खायाला देतां
बाळमनीं ठसलें अहाहा ! सण दसरा मोठा !

❀ ❀ ❀

शिशुपण जावोनी पातला काळ उमेदीचा
न कळे परि कोठें हर्ष तो हरपे दसऱ्याचा !

नव तारुण्याचें रक्त सळसळतें देहांत
उत्साह परी ना लुटाया सोनें लवमात्र !

पानें आपट्याचीं खुडोनी 'सोनें' त्यां गणणें !
भगिनिस देउनि तें स्वतःला ओंवाळुनि घेणें !

प्रति संवत्सरिं हें — चालणें रोंखिव रडगाणें
धिग् जीवित असलें — गमतसें मज लाजिरवाणें !

— तोंच पूर्वजांचा — आठवे उज्वल इतिहास
चित्त–चक्षुनें तो — पाहतां सुटती निःश्वास !

*　　*　　*　　*

पूर्वज रणधीर — आमुचे लढवय्ये खन्दे
मर्दपणें ज्यांहीं — रोंविले अटकेवरि झेण्डे;

— पूर्वज ते अमुचे — दिल्लिचें तख्त फोडणारे
वंशज अम्हि त्यांचे — शमीचीं पानें लुटणारे !

टोपीवाल्यांचे — लाख ते मुजरे घेणारे
अम्ही साहिबाची — हन्त हा ! थुङ्क झेलणारे !

विमनस्कपणें ही — अधोगत–स्थिति जाणिव होतां
पुरेपूर पटतें — ‘ नको हा दसराच करण्टा ! ’

*　　*　　*　　*

बालपणीं गमला — मला जो सण दसरा मोठा
तारुण्यांत परी — सम्प्रतीं भासतसे खोटा !

वार्धक्यीं — ? पण छे, — नको ती कल्पनाच आतां
त्याहुनि मरण बरें — नेइं तव गेहीं भगवन्ता !

विजयादशमी,
शके १८५५
तळें ( कुलाबा )
७ आक्टोबर १९३०

# ही पहा दिवाळी आली वैभवशाली !

[ जातिः— भूपती वैभव ]

कां खिन्न राजसा ! विचरसि चिन्ताजालीं ?
ही पहा दिवाळी आली वैभवशाली ! ध्रु०

वर्षर्तु वितरुनी वसुन्धरा न्हालेली
नव शारदीय – शृङ्गार – सम्पदा ल्याली !

जळिं स्थळीं शान्ति समृद्धी । वसतसे
खग – भृङ्ग – गीति ये कानीं । मधुरसें

नवरात्र जागवुनि सीमोल्लङ्घित झाली
शुभकरा दिवाळी गाजत वाजत आली ! १

नर–नारी उठुनी प्रभात मङ्गल कालीं
अभ्यङ्ग स्नात जाहली शिशूजनमेळीं;

मिष्टान्न सेवुनी बालसृष्टि फुलकेली
' फुलबाजि चन्द्रज्योतींत ' रङ्गुनी गेली !

दशदिशीं दिव्य चैतन्य । सञ्चरें
आनन्द – सुधा – निस्यन्द । पाझरे !

—जणुं आत्मज्योति – तेजांत अमङ्गल जाळी
शुभ अशी दिवाळी आली वैभवशाली ! २

पुणें–सातारा रोड
२३ आक्टोबर १९३४

---

# कटु सत्य !

[ एकदां सार्वजनिक समारम्भ – समयीं कुण्या एका गतधवा तरुणीनें सहजगत्या डोक्यांत गुलाबाचें फूल खोविलें; त्यावेळीं वाटलें तें :— ]

[ वृत्त—शार्दूलविक्रीडित ]

अम्बाड्यांत गुलाब – पुष्प सहजीं, बाले ! तुवा खोविलें;
सारें दृश्य विलोभनीय, परि कां मच्चित्त गे पोळलें ?
भाल – प्रान्त उदास, हाय ! — न दिसे तो कुङ्कुमालङ्कृत !
शृङ्गराङ्कित देह हा तव मुसल्मानी गमे ताबुत !! १

दादर, मुंबई
१५ मे १९३४

# गोड अबोला !

[ जाति—मदालसा ]

त्याची तिच्यावरती असे प्रीती अनिर्वचनीय कीं
तिजला गमे त्याच्यासवें जीवित लाभे सार्थकीं !

तण्टे बखेडे प्रीतिचे लटके सुखी युगलामधीं—
होती, समेटहि व्हावया लागे न कधिं कालावधी !

—अशिं एकदां दोघें वितण्डुनि, आणुनि उसनें बळ,
धरुनी अबोला बैसतीं, परि तेढ सारी पोकळ !

त्याची मनीषा हीच ' बोलावें तिनें आधीं स्वयें '
इच्छा तिची, ' बिनशर्त माफी मागण्या यावें तयें ! '

दिन सम्पुनी तिन्हिसाञ्ज सरुनी, शर्वरी मधु पातली
माघार घेईना कुणी, शय्येवरी जरि झोंपलीं !

हुळहूळणारे स्वाभिमानी जीव ते दोन्ही खुळे
मृदु-पाशिं निद्रादेविच्या रत मध्यरात्रीं जाहले !

स्वप्नांत मारी हांक ती ' प्रिय नाथ ' भोळी भामिनी
अन् त्याच वेळीं स्वप्निं तो बोले ' प्रिये ! ' सोत्कण्ठुनी !

जागीं परस्पर जाहलीं, हळुवार चुम्बुनि हांसलीं
आलिङ्गुनी सुखसागरीं जोडी मुदें ती रङ्गली !

दादर, मुम्बई }
४ जून १९३४ }

# बन्धन !

[ जाति—केशवकरणी ]

बन्ध कुणाचा मला न जगिं, मी मुक्त बन्धनांतुन
— कारण खम्बिर माझें मन ! ध्रु०

तुफान दर्या पुरा खवळला, गेला फैसाळुन
— जाउं था;—सहजीं उल्लङ्घिन !

हिमाचलाचा बान्ध आडवा पथ धरि मम रोंखुन—
लीलया तोही ओलाण्डिन !

जनसम्मर्दी कोण्डी करुनी, ठेवियलें कोण्डुन
तडक तरि जाइन ती फोडुन !

इन्द्रधनू अन् शेषशायि या दोघांची गुम्फण
तटतटां टाकिन मी तोडुन !

—बन्धनें जगांतिल सारीं हीं दुर्बळ
बळ दैविक माझें अमर्याद अवखळ
( ईषदेक ठरतें तेंहि विफल केवळ ! )

— प्रियसखिचा करपाश कण्ठि पडतांच हरपतें मन !
गोड तें न तुटे मज बन्धन !

दादर, मुंबई }
६ नोव्हेंबर १९३३ }

# कावळ्यास—

[ जाति —अवनी ]

' काव काव काव ' करिसि कावळ्या ! कशाला ?
कर्कश रव काढुनि कां शिणविसीं गळ्याला ? धृ०

मङ्गलमय सुप्रभात
अवनीतल भूषवीत !
लाभत तुज ओरडण्या हीच काय वेळा ? १

निळसर नभ — मण्डपांत
चालें मधु खग — सङ्गित;
मन्द समीरण वाहत, सांथ देत त्याला ! २

गुञ्जन करितात भृङ्ग
निर्झर गानांत दङ्ग !
बेसुर तव सूर त्यांत मिळविसी कशाला ? ३

' सुन्दर शुभ कांहिं जिथें
टाकूं विष — बिन्दु तिथें '
अवगत तुज एकाक्षा ! कुटिल नीच — लीला ! ४

रूप तुझें जग — जाहिर !
निरुपम तर कण्ठ—स्वर !
कळत न मुळिं, काय म्हणूं फोल दिमाखाला ! ५

थाम्बविं रे ' काव काव '
धारण करिं मूक — भाव;
होशिल मग पात्र खुळ्या ! मानवी — कृपेला ! ६

दादर, मुंबई }
१० मे १९३४ }

---

# ' तुज टाकुनि जातें बाळा '—

[ समाज सैतानाच्या भीतीनें एक अनाथ वञ्चिता, आपल्या लाडक्या व्हानग्याचा निरोप घेत आहे. ]

( चालः—' आशिर्वाद ' कवनाची )

तुज टाकुनि जातें बाळा ! प्रभु तुजला तारणार ! ध्रु०

स्वजनन माझिया उदरीं
परि माय म्हणविण्या चोरी !
मृदु माया – पांखर आतां कुठुनि तुला लाभणार ? १

भूषणें पृथ्विमोलाचीं
योग्यता तुझी ल्यायाची !
त्या तुला चिन्धि ना लाभे, नियतीचा कटु प्रहार ! २

जन्मतां जन्मदात्रीचा
चिर वियोग तुज व्हायाचा
हा भोग पूर्वजन्मींचा कधिं बाळा ! सम्पणार ? ३

—क्षिति मुळीं न मज देहाची
गत जगीं परी तव कैंची ?
चमकतां कल्पना वाटे, उरिं मारी कुणि कुठार ! ४

पशुपक्षी फिरती रानीं
निज पिलांस चारा पाणी —
आणिती पांखरा ! माझ्या कोण तुला पाहणार ? ५

करुं खरें कासया शोक ?
अश्रुंचा वृथा अभिषेक !
उचित ना मोह — मुग्धा मीं, तरि मातें हा विचार ! ६

अम्बरांत नक्षत्रांची
गिरि गव्हरांत सुमनांची —
काळजी वाहि जो कोणी, तो तुजही रक्षणार ! ७

देणार तुला मी काय ?
तव माय बाळ ! असहाय्य !
अश्रुंचा हार गुम्फोनी तव कण्ठीं घालणार ! ८

दादर, मुबई
१९ एप्रील १९३३

# विजोड जोड !

[ जाति—पञ्चचामर ]

विजोड जोड या जगीं स्थळीं स्थळीं कशी दिसे !
चमत्कृती बघूनि ही, विषण्णता मनीं ठसे ! धृ०

—प्रमत्त भृङ्ग दुर्गुणी
गुणि विलोल कमलिनी;
कठोर दैवदुर्विलास, घडुनि योग येतसे ! १

नदी सुधौघ – वर्षिणी
नितान्त मञ्जु भाषिणी,
मिळूनि क्षार – सागरां उरीं फुटूनि जातसे ! २

कलङ्कयुक्त चन्द्रमा
तशांतुनी क्षयी पुन्हां !
हताश रोहिणी जिणें, तयासवें क्रमीतसे ! ३

कुटिलतम घनाङ्किता
अचपळ विद्युल्लता—
त्यजूनि त्या जलोदरासि, भुवनिं धांव घेतसे ! ४

शिखी बघूनि एकला
जिव किती विलोभला !
मयूर – युग्म तें परी, करी मनां उदाससें ! ५

जिथें तिथें विजोड ही
विषमतायुता मही !
तटतटां तुटे म्हणूनि आंतडें; जडें पिसें ! ! ६

दादर, मुंबई
२० जुलै १९३४

# महाभागा मृत्यो....!

[ वृत्तः—शिखरिणी. ]

महाभागा मृत्यो ! तुजविषयिं अत्यादर मला
जगानें वा ! तूतें जरि बहुपरी दोष दिधला !
तुझ्या अस्तित्वाची अविरत अम्हां जाणिव असे
दया–शान्ती–प्रीती–महति तुजपायीं कळतसे ! १

तुझी दृष्टी केव्हां कधिं कुणिकडे भेदक वळे !
तुझा घाला केव्हां अवचित कसा येइ न कळे !
असे राजा हा, वा धन–विहिन हा भेद न तुला
गुणी, ज्ञानी, मानी, लघु, गुरु दुजाभाव तुरळा ! २

विषाच्या बिन्दूनें जन–मनिं ठसे अमृत–रुची
तशी सौन्दर्याला खुलवित स्वयें विकृत–कृती !
प्रभा श्रीमन्तीची पसरवित दारिद्र्य–तम तें
तुझ्यापायीं मृत्यो ! मनुज–तनु–माहात्म्य कळतें ! ३

त्यजोनी जायाचें जड शरिर हें एक दिवशीं
नसे प्राणीमात्रां निमिषभर ती शाश्वति कशी !
जरी आम्हांला हें ढळढळित आलेख्य पटत
जगीं ठायीं ठायीं विहरत तरी शाठ्य विकट ! ४

— अशा या विश्वाला जरब तव कांहींच नसती
कळा कल्पान्ताची अवनितलिं साऱ्या वितरती !
सखा तूं पृथ्वीचा वरिवरि जरी निष्ठुर–कृती
तिच्या सौभाग्याची तरिच तुजला आंच इतुकी ! ५

५ एप्रील १९३५
दादर, मुंबई

# कां गातसां स्त्री–जातिला ?

[ जातिः—मदालसा. ]

—आणि कवनीं गातसां कां सारखे स्त्रीजातिला ?
प्रश्न कोणीसा असा पुसतां, गळा मम दाटला !

गाऊं नको स्त्रीजातिला ? गाऊं कुणा मग मी बरें ?
चित्‌शक्ति जी विश्वांतली, कशि विस्मरावी पामरें ?

जी कन्यकारूपें गमे जणुं प्रेमसरिता उद्गम
मृदु चित्त अन् तनु कोमला संसार–तरुवरिंचें सुम !

लावण्यवति ती यौवनीं स्वबळें करी जनरञ्जन
निज मोहिनी वितरूनि भुवनीं माजवी रणकन्दन !

सहवास जीचा लाभतां निरयास ये स्वर्गीयता !
सुरलोकही नरकाकृती तिजवीण पावे तत्त्वतां !

मातावतारीं जी करी सस्नेह पृथ्वी–पालन
देवादिकांचें, मानवांचें जीमुळें संवर्धन !

दुहिता–सुकान्ता–जन्मदा त्रिविधस्वरूपा स्वीकरी
भुवनत्रयीं अधिदेवता शुभमङ्गला कीर्ती वरी;

—गाऊं नको स्त्रीजाति ती, गाऊं कुणां मग आदरें ?
चित्‌शक्ति जी विश्वांतली कशि विस्मरूं मी ती बरें ?

दादर, मुंबई }
१० जुलै १९३४ }

# घुबडा ! व्यर्थ तुझा घूत्कार !

[ कवि—हृदयाच्या नालायकीचे बेजबाबदार बोल, 'विडम्बन' या साळसूद नांवाखालीं बेसुमार पैदा होऊं लागल्यामुळें, प्रत्युत्तरादाखल खालील प्रकारचे उद्गार निघाल्यास नवल कसचें ? ]

[ जाति —कोकिळा ]

व्यर्थ तुझा घूत्कार !—घुबडा ! व्यर्थ तुझा घूत्कार !
जातिवन्त कविहृदय न त्यानें लेशमात्र डरणार ! धृ०

—भूगर्भान्तरिं वाहे निर्झर
दुस्तर खडकां देउनि टक्कर
उफाळुनी नाचत अवनीवर
लतावेलिंना आनन्दवुनी अखण्ड खळखळणार ! १

देवदानवें जर्जर केला
जीवन्मृत मुनिशापें झाला,
दैवबलें क्षय जडला त्याला,
चन्द्रबिम्ब उत्फुल्ल पाहुनी उदधि उचम्बळणार ! २

सूर असो बेसुर वा सुस्वर,
जड जगताची फिकिर न तिळभर !
गीत गात बिजलीचें सुन्दर—
मेघराज निश्शङ्क अम्बरीं सहर्ष गडगडणार ! ३

घूत्काराच्या भेसुर नादें
दाहि दिशा स्वच्छन्द घुमूं दे!
त्यामुळेंच परि गमती उमदे—
गगनविहारी चण्डोलाचे गोड गीत – झङ्कार! ४

शकुन आणि अपशकुन कुणाला?
जो हृदयाचा कच्चा त्याला;
खुशाल चालिव ' घू घू ' चाळा
कवि–मुखाब्ज–मकरन्द निरन्तर रसिकभृङ्ग लुटणार! ५

दादर, मुम्बई
२२ नोव्हेंबर १९३१

# जगाचा न्याय !

[ गझल ]

जगीं या डामडौलाचा पसारा माजला सारा
सचोटी न्याय नीतीला जगीं या लेश ना थारा ! ध्रु०

क्षयी चन्द्रा ! कशाला रे जिवाचा होम तूं केला
रवीच्या कळकळाटानें धरेचा नूर मोहरला !

दिनक्रम मञ्जु गानाचा वृथा भृङ्गा ! तुझा झाला
खुळी तव पद्मिनीबाला विधूनें मोहिलें तिजला !

प्रियेसाठीं स्वदेहाच्या जयानें चिन्धड्या केल्या
त्यजोनी मेघ, बिजलीनें वरावें लोह – खण्डाला !

दरीखोरीं जुमानी ना उमाळा प्रीतिचा आला
सती सरिता सरित्पतिची निघाली भेट घ्यायाला;

परी जलधी भुले बघुनी सुधांशू – रश्मि – जालाला
—खऱ्याला मोल मातीचें, रुचे हा खेळ दैवाला !

रुचे हा खेळ दैवाला दिखाऊचा चढे पारा
जगीं या डामडौलाचा पसारा माजला सारा !

दादर, मुंबई
२४ आक्टोबर १९३१

# बन्दिवान पोपटा....!

[ चालः — घन-श्याम सुन्दरा ]

बन्दिवान पोपटा ! कशाला धडपडसीं पञ्जरीं ?
तिथेंच राहीं मित्रवरा रे ! सोन्याच्या मन्दिरीं ! ध्रु०

डाळ, पेरु, डाळिम्ब, कलिङ्गड खाद्य खावया जरी,
सुगन्धमय जल वाळामिश्रित मिळतें प्याया वरी !

सुखासुखीचा घांस तोण्डचा सोडुनि वेड्यापरी,
वणवण विपिनीं फिरावयाची येत तुला शिरशिरी !

कानमन्त्र तुज स्वातन्त्र्याचा दिधला कां कुणि तरी ?
तरीच तडफड, अफाट धडपड चालत ही पञ्जरीं !

गोड गुलाबी, नको विसम्बूं सोज्वळ थापावरी
थाम्ब थाम्ब खगवरा ! अन्तरीं संयम कांहीं धरीं !

आणि विहङ्गम – नजर टाक तूं सभोंवतीं क्षणभरी
अन्नासाठीं तिळ तिळ तुटतो लाख जीव भूवरीं !

निढळाचा ढाळुनी घाम अश्रान्त मेहनत करी
कामकऱ्याला पोटापुरती तरि न मिळे भाकरी !

चार शब्द पढविले, बोलले, रमले सुखसागरीं;
कशास आटापीट व्यर्थ ही दुर्दर गिरिकन्दरीं ?

गिरिगव्हरिं हिण्डतां व्याध–शर अवचित बसतां उरीं
स्वातन्त्र्याच्या तरल कल्पना विरतिल वाऱ्यावरी !!

दादर–मुम्बई }
१६ फेब्रुवारी १९३५ }

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं.
ता.
ठाणें.

# हुरहूर

[ जाति — मनमोहन ]

कां कळत न हृदयान्तरिं एकाकीं लागत ही हुरहूर ! धृ०

चैन जीवा या सुखीं ना
मन खुळें कोठें रमेना !
हृत्तार छेडण्या धीर न होई — उठतिल कीं बदसूर ! १

युक्त जें कर्तव्य कांहीं
हातुनी लव होत नाहीं !
अव्यक्त विचारांचें उद्भवतें चित्तान्तरिं काहूर ! २

उणिव कसली हृदिं विराजे ?
हरपलें तरि काय नुमजे !
नित लपण्डाव नियतीचा चाले मन्मनसीं निष्ठूर ! ३

गुणगुणाव्या चार पङ्क्ती
प्राप्त व्हाया चित्तशान्ती ;
परि कर्णरन्ध्रिं घुमतात सूर कीं भलभलते भेसूर ! ४

गत स्मृती गाडूनि पाठीं
जाणण्या भवितव्यता ती—
क्षणमात्र होत उच्छृंखल माझें मन भारी आतूर ! ५

कल्पनेचे मधु मनोरे
वाहतां नैराश्य वारे—
डळमळुनि कोसळुनि पडली; त्यांचा होई चकाचूर ! ६

‘ खेळ सारे भावनांचे
क्षणिक साचें राज्य त्यांचें ’;
जरि विवेकवाणी शान्तवीत तरि धडधडतो हा ऊर ! ७

सम्भ्रमित सन्त्रस्त स्थिति ही
अन्तरींचा ठाव पाही !
अन् उचम्बळुनि हृत्सरिता वाहे दुःखाश्रूंचा पूर ! ! ८

दादर, मुंबई
१२ सप्टेंबर १९२२

# सोक्ष मोक्ष !

[ जाति — पञ्चचामर ]

सोक्ष मोक्ष व्हायचा असेल काय होउं दे
देवते ! भला बुरा उपासकास कौल दे ! ध्रु०

किती क कण्ठल्या निशा
असह्य होय दुर्दशा;
रसातळास नेइं वा, करांत स्वर्ग येउं दे ! १

न तीर हें, न तीर तें
अधींमधीं तरङ्गतें—
बनूनि काष्ट, शल्य तें हृदन्तरीं दुणावतें ! २

विहार दूर अम्बरीं
भयाण दारुणी दरी !
त्रिशङ्कुच्या परी नको अधान्तरीं जिणें रितें ! ३

असेल इन्द्रचाप कीं,
कराल सर्प वासुकी !
फिकीर ना;—ललाट-लेख एकदां न्यहाळुं दे ! ४

सुधार्णवीं सदा उरीं
निमज्जनीं स्पृहा जरी
नशीबिं नर्क–दुर्गती ..?–तयार ऐकण्या मुर्दे ! ५

मृगोदकां भुलोनिया
अफाट धांव घ्यावया—
न त्राण लेश या जिवां, विसांवण्यास स्थान दे ! ६

कशास व्यर्थ वञ्चना ?
पुरे गडे, कुचम्बणा !
निकाल-खड्ग फेंकुनी, विशुद्ध-चित्त-लाभ दे ! ७

दादर, मुम्बई
९ डिसेम्बर १९२४

# जोडी !

[ चालः–झिम्मा खेळूं ये ग... ]

गऽळ्यांत गऽळा घालूं गऽळ्यांत गऽळा
एकाकी या जीवनाचा येत कण्टाळा ! ध्रु०

चन्द्र सूर्य आकाशांत
एक एकटे हिण्डत;
भडकला सूर्य आणि चन्द्र खङ्गला ! १

वीज – मेघ नभाङ्गणीं
विहरती स्वच्छन्दानीं,
वृक्ष – वल्लींचा खेळ रानीं चालला ! २

नदी शोधे सागराला
शशी – वेध पद्मीनीला !
चक्रवाकां चक्रवाकी मोही प्रेमळा ! ३

रात्र दिसा मागें धावे
छाया प्रकाशीं सामावे,
ध्वनीनाद पोकळींत मिळूनि गेला ! ४

ठायीं ठायीं विश्वापाठीं
जोडीसाठीं आटापीटी !
—जोडीवीण जीविताचा गाडा पाङ्गळा ! ५

तुझी माझी छान जोडी
माझी जीवन – वावडी—
तुझ्या प्रेम – रज्जूची ग ओढ तीजला ! ६

दादर, मुंबई
२३ सप्टेंबर १९३४

# आपुलकी

[ वृत्त—शार्दूलविक्रीडित ]

चन्द्राला गगनाङ्गणीं बघुनिया सिन्धूर्मि हेलावती
त्याची रम्य तरङ्ग–ताण्डव–कृती आल्हाददायी किती !
कोठें चन्द्र ? विशाल सागर कुठें ? सम्बन्ध कांहीं तरी ?
क्षीराब्धी शशि–दर्शनेंच परि हा आनन्दतो अन्तरीं !

वाताश्वारुढ जात अम्बरपथीं ती श्याम मेघावली
मार्गीं देवि वसुन्धरा दिसुनि ये भारीच कोमेजली !
सौहार्दें सहकम्प–मेघ–हृदयें नि श्वास सोडूनि तीं—
अश्रूंचा अभिषेक दिव्य करुनी भूमङ्गला न्हाणिती !

पूर्वेला रविराज डोङ्गर–शिरीं डोकावुनी पाहतो
पक्षीवृन्द सहर्ष मञ्जुळ रवें गाणीं म्हणूं लागतो !
नित्याचा क्रम एकमेव सविता आकाशफेरी करी
त्यातें पाहुनि सूर्यफूल चिमणें नाचें फिरे भूवरीं !

—नान्दे आपुलकी जगांत म्हणुनी वाटे जगावें मला
या अत्युत्कट भावनेविण जगां ये रौरवाची कळा !

दादर, मुंबई }
२२ डिसेम्बर १९३४ }

# अकारण वैर !

[जातिः—मोहिनी]

तुझा आणि माझा सखया ! काय बरें दावा ?
कारणाविना त्वां हेवा, कां असा करावा ? ध्रु०

कुठें रोप इवलेसें मी जपुनि लाविलेलें
कोम्ब जोमदार तयाला फुटूं लागलेले !
चित्र भावि उज्ज्वलतेचें पुसट रेखलेलें
नाश-भाव-उद्भव परि तव अन्तरांत व्हावा ! १

भूमिभाग क्षारजलानें किती व्यापलेला !
कितिक वाहताती सरिता, मिळति सागराला
क्रूर नक्रपूरित गणति न, डोह तडागाला !
सान निर्झराचा पथ तूं मात्र थोपवावा ! २

मदिय कार्य-कर्तृत्वाचें उभविलें निशाण —
सुखद सौम्य प्रेमानिल नित वाहतां वरून
फडफडेल गगनीं, घुमविल दिव्य यशोगान !
—हाय ! वाञ्छिसी ध्वज उभदा उलथुनी पडावा !! ३

दादर, मुंबई
११ फेब्रुवारी १९३५

REFBK-0005351

REFBK-0005351

५३५१